# “सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसयटी अतंर्गत येणाय्रा पुणे विभागातील व्यवस्थापकीय (एम . बी . ए . ) महाविदयालयातील ग्रंथालयाच्या अर्थ संकल्पाचा अभ्यास” .

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, येथील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या अभ्यासक्रमाच्या एम . फिल पदवीकरीता सादर करण्यात आलेला प्रबंध .


**संशोधक**

पद्‌मजा भिमराव उबाळे

**मार्गदर्शक**

डॉ . सुनिता बर्वे

(एन . सी . एल . पुणे)

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,गुलटेकडी,

पुणे-४११०३७


**संशोधन वर्ष**

२०१२-१३

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, खालील सांक्षाकित मुल्यांकन केलेला, सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसयटी अतंर्गत येणाय्रा पुणे विभागातील व्यवस्थापकीय(एम.बी.ए.) महाविदयालयातील ग्रंथालयाच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास" संशोधन प्रकल्प संशोधक उबाळे पद्मजा भिमराव यांनी सादर केलेला असून एम.फिल. (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र) यापदवीच्या पुर्ततेसाठी स्वीकृत/अस्विकृत करण्यात आला आहे.

अंतर्गत परीक्षक — बाहय परीक्षक

सही- — सही-

नाव- — नाव-

दिनांक -

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते, की टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ग्रंथालय आणि माहितशास्त्र या विषयामधील एम.फिल. या पदवीकरीता उबाळे पद्मजा भिमराव या संशोधकाने "सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अतंर्गत येणाऱ्या पुणे विभागातील व्यवस्थापकीय (एम.बी.ए.) महाविदयालयातील ग्रंथालयांच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास" या विषयावरील संशोधन प्रकल्पाचे काम माझ्या मार्गदर्शना खाली समाधानकारकरित्त्या पूर्ण केलेले आहे.

सदर संशोधन प्रकल्पामध्ये त्यांनी नमुद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहिती प्रमाणे बरोबर आहेत.

ठिकाण: पुणे

मार्गदर्शक

दिनांक:

डॉ.सुनिता बर्वे

(एन.सी.एल.पुणे)

# संशोधकाचे प्रतिज्ञापत्र

संशोधक उबाळे पद्मजा भिमराव असे प्रमाणित करते की, "सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसयटी अतंर्गत येणाय्रा पुणे विभागातील व्यवस्थापकीय (एम.बी.ए.) महाविदयाल यांतील ग्रंथालयांच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास" या संशोधन प्रकल्पातील सर्व महिति मुळ संदर्भातून संकलीत केली असून ,त्या माहितीचा संदर्भ योग्य त्या ठिकाणी नमूद केला आहे.

हा संशोधन प्रकल्प माझा स्वत:चा असून, या विषयावर यापूर्वी संशोधन झालेले नाही याची मी खात्री करून घेतली आहे.तसेच मी हा संशोधन प्रकल्प इतर कोणत्त्याही विद्यापीठात सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे

अभ्यासक

दिनांक :

उबाळे पद्मजा भिमराव

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयामधील एम.फिल या पदवी करीता हा संशोधन प्रकल्प सादर करताना मला अनेकांचे सहकार्य लाभले आहे. पहिल्यांदा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांची मी अतिशय आभारी आहे. कारण या विद्यापीठाने सदर अभ्यासक्रम सुरू केला. नोकरी करत असताना ही मला या अभ्यासक्रमास प्रवेश मिळवून हा संशोधन प्रकल्प सादर करता आला तो या विद्यापीठामुळेच. त्यामुळे या विद्यापीठाची मी मनापासून ऋणनिर्देश करते.

तसेच प्रस्तुत संशोधन प्रकल्प सादर करण्यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्याकडून संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल मी या विद्यापीठातील ग्रंथालयशास्त्र विभाग प्रमुख श्रीमती खंदारे मॅडम यांची ऋणी आहे. प्रस्तुत प्रकल्पाच्या मार्गदर्शिका डॉ. सुनिता बर्वे मॅडम यांची मी शतशः आभारी आहे, कारण त्यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शना मुळेच मी आज हा प्रकल्प पूर्ण करू शकले.

मी संशोधन कार्य करताना सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट वडगांव बु. या महाविद्याल याचे ग्रंथपाल श्री. तादगे सर, प्रमुख ग्रंथपाल डॉ. अमिता प्रधान मॅडम एस. के. एन. एस. एस. बी. एम. चे ग्रंथपाल राहुल सर आणि माझे कलिग, रतन ढोक, प्रियांका करांडे आणि माझा भाऊ समाधान उबाळे तसेच माझे सहकारी, मित्र मंडळी यांनी प्रकल्प तयार करण्यात मदत केल्या बद्दल मी त्यांची अत्यंत ऋणी आहे.

ठिकाण: संशोधक

दिनांक: (उबाळे पद्मजा भिमराव)

# अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| | प्रमाणपत्र | I |
| | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II |
| | संशोधकाचे प्रतिज्ञापत्र | III |
| | ऋणनिर्देश | IV |
| | अनुक्रमणिका | V-VI |
| १ | **प्रकरण-१ले** | |
| १.१ | प्रस्तावना | १ |
| १.२ | संशोधनाचा विषय | २ |
| १.३ | संशोधन विषय निवडीचे महत्व | २ |
| १.४ | संशोधनाची व्याप्ती | ३ |
| १.५ | संशोधनाचे उद्दिष्टये | ४ |
| १.६ | गृहितके | ४ |
| १.७ | संशोधनाची पध्दती आणि व्याख्या | ४ |
| १.८ | संशोधनाचा अर्थ | ६ |
| १.९ | संशोधनाच्या पध्दती किंवा प्रकार | ८ |
| १.१0 | पूर्वाभ्यासाचे समालोचन | १३ |
| २ | **प्रकरण-२रे**<br>**अर्थसंकल्प म्हणजे काय** | |
| २.१ | प्रस्तावना | १७ |
| २.२ | ग्रंथालय म्हणजे काय | १८ |
| २.३ | ग्रंथालयाच्या व्याख्या | २0 |
| २.४ | अर्थसंकल्प म्हणजे काय | २१ |
| २.५ | अर्थसंकल्पाची व्याख्या | २२ |
| २.६ | अर्थसंकल्पाच्या पद्धती | २४ |

| | | |
|---|---|---|
| २.७ | अर्थसंकल्पाचे महत्त्व | ३२ |
| २.८ | ग्रंथालयातील अर्थसंकल्प मंजुरीची प्रक्रिया | ३९ |
| २.९ | अर्थसंकल्पाची मांडणी | ४३ |
| २.१0 | अर्थसंकल्पाचे नियंत्रण | ४६ |
| २.११ | अर्थसंकल्पाच्या नियंत्रणाचे फायदे | ४७ |
| २.१२ | अर्थसंकल्पाच्या नियंत्रणाचे तोटे | ४७ |
| २.१३ | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत व्यवस्थापन महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अर्थ संकल्प | ४८ |
| **३** | **प्रकरण-३रे** | |
| ३.१ | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचा इतिहास | ४९ |
| ३.२ | संशोधकानी अभ्यासलेली महाविदयालयांची माहीती | ५५ |
| ३.३ | संशोधकाने अभ्यासलेली महाविद्यालयांची टेबलमधील यादी पुढील प्रमाणे आहे. | ६६ |
| **४** | **प्रकरण-४थे** | |
| | माहिती संकलन ,सादरीकरण आणि विश्लेषण | ७२ |
| ५ | प्रकरण-५वे | |
| ५.१ | निष्कर्ष | १२६ |
| ५.२ | शिफारशी | १२९ |

| | | |
|---|---|---|
| ५ . ३ | पुढील संशोधनाची दिशा | १३१ |
| ५ . ४ | परिशिष्ट | |
| ➢ | संदर्भसूची | १३२ |
| ➢ | प्रश्नावली | १३७ |
| ➢ | सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या व्यवस्थापन महाविद्यालयाची यादी . | १४४ |

# तक्त्यांची सूची


| तक्ता क्रमांक | तक्त्याचे शीर्षक | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| १ | एन.बी.ए.मुल्यमापन(National Board Accreditation) | ७४ |
| २ | एकुण प्रवेश क्षमता किती आहे | ७५ |
| ३ | ग्रंथालयाची वेळ किती आहे | ७७ |
| ४ | ग्रंथालयातील कर्मचारी किती आहेत | ७९ |
| ५ | ग्रंथालय व्यवस्थापनासाठी ग्रंथालय समिती आहे का? | ८१ |
| ६ | ग्रंथालयाचा निधी कोणत्त्या मार्गाने उपलब्ध होतो | ८२ |
| ७ | ग्रंथालयाच्या अर्थसंकल्पाचा अर्थिक वर्षाचा कालावधी | ८३ |
| ८ | ग्रंथालयाचा मागील पाचवर्षाचा पूर्ण अर्थसंकल्प | ८४ |
| ९ | ग्रंथालय अर्थसंकल्पाचा ग्रंथ आणि ईबुक्सवर होणारा वापर | ८६ |
| १० | ग्रंथ बांधणी साठीचा अर्थसंकल्प | ८९ |
| ११ | छापील नियतकालिक वर्गणी अर्थसंकल्प | ९२ |
| १२ | छापील नियतकालीकांच्या बांधणी साठीचा अर्थसंकल्प | ९५ |
| १३ | ऑनलाईन डेटाबेस (Online Database) वर्गणी अर्थ संकल्प | ९८ |
| १४ | ग्रंथालय फर्निचर खरेदीसाठी लागणारा अर्थसंकल्प | १०१ |
| १५ | ग्रंथालय राष्ट्रीय किंवा विभागीय नेटवर्कचे सभासद आहे का? | १०४ |
| १६ | ग्रंथालय(Inter Library Loan) अर्थसंकल्प | १०५ |
| १७ | ग्रंथालय हार्डवेअर देखभाली साठीचा अर्थसंकल्प | १०७ |
| १८ | ग्रंथालयातील सॉप्टवेअरच्या देखभालीसाठीचा अर्थ संकल्प | ११० |

| | | |
|---|---|---|
| १९ | ग्रंथालयाची स्वःताची वेबसाईट आहे का? | ११२ |
| २० | ग्रंथालय वेबसाईट देखभालीसाठीचा अर्थसंकल्प | ११३ |
| २१ | अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी अर्थसंकल्पात केलेली तरतूद | ११५ |
| २२ | ग्रंथालयातील कर्मचार्यांचा दर्जा सुधारण्यासाठीचा अर्थ संकल्प | ११८ |
| २३ | ग्रंथालयातील सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी अर्थसंकल्पात केलेली तरतूद | १२१ |
| २४ | पूर्ण अभ्यासामध्ये अर्थसंकल्पात वाढ झाली आहे का? | १२३ |
| २५ | ग्रंथालय विकासा संर्दभात भविष्यकालिन काही योजना आहेत का? | १२४ |

# आलेखाची सुची


| आलेख क्रमांक | तपशील | पृष्ठक्रमांक |
|---|---|---|
| १ | एकुण प्रवेश क्षमता किती आहे | ७६ |
| २ | ग्रंथालयाची वेळ किती आहे | ७८ |
| ३ | ग्रंथालयातील कर्मचारी किती आहेत | ८० |
| ४ | ग्रंथालयाचे मागील पाचवर्षाचा पूर्ण अर्थसंकल्प | ८५ |
| ५ | ग्रंथालय अर्थसंकल्पाचा ग्रंथ आणि ईबुक्सवर होणारा वापर | ८७ |
| ६ | ग्रंथ  बांधणी साठीचा अर्थसंकल्प | ९० |
| ७ | छापील नियतकालिक वर्गणी अर्थसंकल्प | ९३ |
| ८ | छापील नियतकालीकांच्या बांधणी साठीचा अर्थ संकल्प | ९६ |
| ९ | ऑनलाईन डेटाबेस (Online Database) वर्गणी अर्थसंकल्प | ९९ |
| १० | ग्रंथालय फर्निचर खरेदीसाठी लागणारा अर्थसंकल्प | १०२ |
| ११ | ग्रंथालय(Inter Library Loan) अर्थसंकल्प | १०६ |
| १२ | ग्रंथालय हार्डवेअर  देखभाली साठीचा अर्थसंकल्प | १०८ |
| १३ | ग्रंथालयातील सॉप्टवेअरच्या देखभालीसाठीचा अर्थ संकल्प | १११ |
| १४ | ग्रंथालय वेबसाईट देखभालीसाठीचा अर्थसंकल्प . | ११४ |
| १५ | अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साधनसामुग्रीसाठी अर्थ संकल्पात केलेली तरतूद | ११६ |
| १६ | ग्रंथालयातील कर्मर्चायाचा दर्जा सुधारण्यासाठीचा अर्थसंकल्प | ११९ |
| १७ | ग्रंथालयातील सेवांचादर्जा सुधारण्यासाठी अर्थ संकल्पात केलेली तरतूद | १२२ |

# प्रकरण -१ ले

## १.१ प्रस्तावना

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. आजची ग्रंथालये केवळ ग्रंथालय राहिलेली नसून त्यांना माहिती व संदर्भ केंद्र म्हणून कार्य करावे लागते. उच्च शिक्षणामध्ये महाविद्यालयीन ग्रंथालये ही शिक्षणाचा आत्मा आाहे. ग्रंथालयाशिवाय अध्ययन व अध्यापनाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही.ग्रंथालयात असणाय्रा ग्रंथ नियत कालिके, वर्त मानपत्रे व ग्रंथेत्तर साहित्य या माध्यमातून ज्ञान उपलब्ध करून दिले जाते. त्याच बरोबर आता माहिती मिळवण्यासाठी आय.सी.टी.चा खुप मोठया प्रमाणात वापर केला जातो.

इतर सर्व संस्थाप्रमाणेच ग्रंथालयाच्या वित्तव्यवस्थेचे दोन प्रमुख घटक आहेत. ते म्हणजे ग्रंथालयाचे उत्पन्न व त्याचा खर्च या दोन प्रमुख घटकांचा मेळ बसविणे हे यातील कौशल्याचे काम आहे. ग्रंथालय ही संस्था असल्यामुळे उत्पन्न व खर्च यांच्या संबंधास वेगळा अर्थ प्राप्त होतो.

ग्रंथालयाच्या विविध कामासाठी पैसा लागतो.हा पैसा कोठून येणार , किती येणार, त्याच्या एकूण रकमेचा अंदाज करणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे खर्चाच्या बाबी कोणत्या, त्यावर किती टक्के अथवा विशिष्ट रक्कम खर्च करावयाची हे करीत असताना जमा व खर्चा चा मेळ घालावा लागतो एखाद्या ग्रंथालयाचा अर्थसंकल्प म्हणजे ग्रंथालयासाठी लागणारा खर्च व तो पैसा जमा करण्यासाठी साधने यांचा तक्ता होय. सर्वसाधारण सर्वच ग्रंथालयांची पैशाची मागणी जास्त रकमेची असते. परंतु मान्य झालेली रक्कम त्या मानाने तुटपुंजी वा कमी असते म्हणून हे अर्थसंकल्प करून त्या मर्यादेमध्ये खर्च करणे, खर्चाच्या प्राधान्य बाबी ठरविणे तसेच उत्पन्न वाढीचे मार्ग शोधणे आवश्यक ठरते.

अर्थसंकल्प तयार करण्यासाठी साधारणपणे गेल्या वर्षी किती रक्कम कोणत्या बाबीसाठी मान्य झाली व प्रत्यक्ष खर्च किती झाला ही माहिती प्रत्येक संस्थेकडे असते. त्या रकमेत १0 ते १५ टक्के वाढ करून अर्थसंकल्प तयार करतात. नियतकालिकांच्या वर्ग णीमध्ये मात्र २0 ते २५ टक्के दरवर्षी वाढ होते.महागाईमुळे ही वाढ अपरिहार्य असते.परंतु एखादी नवीन योजना सेवा सुरू करावयाची असेल तर प्रथम अशा खर्चाची तरतुद करावयाची असते.त्यास योग्य त्या मंडळाची मान्यता घ्यावी लागते.

**१.२ संशोधनाचा विषय ः**

"सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या व्यवस्थापन महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास".

**१.३ संशोधन विषय निवडीचे महत्व :** [१]

व्यवस्थापन या अभ्यासक्रमाचे ध्येय साध्य करताना व्यवस्थापन महाविद्यालयातील ग्रंथालय महत्वाची भुमिका बजावत असते. विद्यार्थी किंवा वाचक हा अभ्यासक्रम पूर्ण करताना व्यवस्थापन महाविद्यालयातील ग्रंथालय कोणकोणत्या सेवा त्यांना देते व त्त्या देण्यासाठी अर्थसंकल्प पुरेसा आहे का? त्यातुन वाचक समाधानी होतो आहे का? हे संशोधनातून स्पष्ट होईल.

विज्ञान तंत्रज्ञानातील नवनवीन शोधामुळे जगात आमुलाग्र बदल होत आहे. त्या अनुषंगाने ग्रंथालय देखील माहिती व तंत्रज्ञानाच्या शोधामुळे प्रगतिपथावर असलेली दिसून

१.गणपुले,श.रा., "ग्रंथालयीन साधनसामग्री आणि सेवा यांचे व्यवस्थापन",नाशिक,२000,पृ २४-२५

येतात. ग्रंथालय हे माहिती प्रसारणाचे माध्यम आहे. आधुनिक काळामध्ये प्रंचड प्रमाणात माहितीची निर्मिती होत आहे. अशा प्रचंड माहिती निर्मितीस माहितीचा विस्फोट असे संबोधले जाते. आज अनेक नवनवीन विषयांवर संशोधन होत आहे. त्यामुळे सतत निर्माण होणारी माहिती ही वाचक, संशोधक, विद्यार्थी, अभ्यासक, प्राध्यापक, शिक्षक इत्यादी अनेकांना हवी असते. अशी माहिती पुरविण्याची जबाबदारी ग्रंथालयावर येत असते. यासाठी वाचकांच्या गरजा व उपलब्ध वाचनसाहित्य त्यासाठी कार्यरत असणारी ग्रंथालय व्यवस्था व त्यापुढे येणाय्रा अडचणी समजावुन घेऊन त्यासाठी उपाययोजना सुचवण्यास व ग्रंथालयीन सेवा अधिक चांगल्याप्रकारे देण्यासाठी या अभ्यासातून मदत होईल तसेच संशोधक स्वत: एक विद्यार्थी असल्याने व भविष्य काळात ग्रंथालय प्रक्रियेतील एक घटक म्हणून प्रत्यक्ष ग्रंथालये,त्यांचा अर्थसंकल्प, तेथील वातावरण, तेथील सेवा सुविधा, कर्मचारी व्यवस्थापन याविषयी माहिती मिळविताना येणारे अनुभव त्यांच्या ज्ञानात मौलीक भर घालेल.

ग्रंथालयाला संशोधन कार्यपूर्ण करत असताना फार मोठी भुमिका पार पाडावी लागते. कारण असे की, कुठलेही संशोधन हे ग्रंथालयाच्या मदतीशिवाय पुर्ण होऊच शकत नाही. संशोधकास ग्रंथालयाची मदत घ्यावीच लागते. त्यामुळे अशा विषयावर संशोधन झाल्याने भविष्यात या विषयावर जो कोणी संशोधन करेल त्याला या संशोधनाचा खुप मोठा उपयोग होईल. त्यामुळे व्यावसायिकदृष्टया अशा विषयावर संशोधन होणे गरजेचे आहे.

**१.४ संशोधनाची व्याप्ती ः**

१) पुणे शहरातील सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीमधील व्यवस्थापन

महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास ही अभ्यासाची मर्यादा आहे.

२) ग्रंथपाल यांच्याकडून मुलाखत आणि प्रश्नावली भरून घेऊन माहिती गोळा करून त्याचा अभ्यास संशोधकाने केला आहे.

३)संशोधकाने मागील (२००८-२०१३)या पाच वर्षांची निवड अभ्यासासाठी केली आहे.

**१.५ संशोधनाचे उद्दिष्टये** ः

१) सिंहगडमधील वेगवेगळया व्यवस्थापन कॉलेजमधील ग्रंथालयातील अर्थसंकल्प जाणून घेणे.

२) अर्थसंकल्पातील किती भाग पुस्तकांसाठी, जर्नलसाठी आणि किती भाग इतर गोष्टीसाठी खर्च केला जातो हे जाणून घेणे

३) जर अर्थसंकल्प कमी किंवा जास्त झाला तर त्याचा ग्रंथालयीन सेवांवर काही परिणाम होतो का हे जाणून घेणे.

१.६ **गृहितके** ः

१) ग्रंथालयास दिला जाणारा अर्थसंकल्प योग्य प्रमाणात आहे.

२)ग्रंथालयातील अर्थसंकल्पांमध्ये ग्रंथालयातील कर्मचाग्रांच्या व्यावसायिक शिक्षणाचा विचार केलेला असतो.

**१.७ संशोधनाची पध्दती** ः

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक पध्दतीचा वापर केलेला आहे.

एखाद्या प्रश्नांची जिज्ञासू वृत्तीने केलेली चिकित्सपणे उत्तरे शोधावी लागतात. याला संशोधन असे म्हणतात.संशोधन म्हणजे काळजीपुर्वक केलेली चिकित्सपणे तपासणी किवा परिक्षण होय.

**व्याख्या :**

१."संशोधन म्हणजे ज्ञानाच्या शाखेत नविन तथ्ये किंवा तत्वे शोधण्यासाठी जुनी तत्वे तपासण्यासाठी काळजीपुर्वक व पध्दतशीरपणे केलेला अभ्यास होय". [२]

२."एखाद्या विषयासंबंधी किंवा घटनेसंबधी अधिकाधिक ज्ञान मिळविणे आणि त्याची अधिकाधिक कारणमीमांसा करणे म्हणजे संशोधन होय". [३]

३.लेटमन व मोरी यांच्या मते"संशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्षात कार्यान्वित करण्याची आकारबध्द सुव्यस्थित आणि सखोल अशी प्रक्रिया होय". [४]

४."सत्यशोधनाची पध्दत म्हणजेच संशोधन होय." क्लिफर्ड मुडी[५]

५."संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीरपणे घेतलेल्या सत्याचा किंवा अज्ञाताचा शोध", एम. एच. गोपाल. [५]

६."संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध" चार्ल बुशा आणि हार्टर [६]

---

२.कुंभोजकर ,ग.वि."संशोधन पध्दती व संख्याशास्त्र,फडके प्रकाशन,कोल्हापूर २००२ पृ १९

३.निकोसे,सत्त्यप्रकाश,"ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्वती",नागपुर २००७, पृ.क ३८-३९

४. सुतार,धनंजय."ग्रंथालय आणि माहितीशास्त्र"सांगली२०११,पृ.२००६-२००८

५.भागवत,श.ग."ग्रंथालय व्यवस्थापन"युनिव्हर्सल प्रकाशन,पुणे २००७पृ.६२-७४

६.रिसवडकर,म.रा."संशोधन व्याख्या आणि पद्वती"यशवंतरा व चव्हाण मुक्त विद्यापीठ.नाशिक़ २०००,पृ.१-१९

७. "एखाद्या प्रश्नांची जिज्ञास वृत्तीने केलेली चिकित्सपणे उत्तरे शोधावी लागतात याला संशोधन असे म्हणतात. (७)

८. "ज्ञान मिळवण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग करण्याची पक्रिया म्हणजे संशोधन होय",रा.श.मुळे आणि उमाठे. (७)

९.D.Slesinger and M.Stephenson in Encyclopaedia of Social Sciences define research as "the manipulation of things¸concepts or symbols for the purpose of generalising to extend¸correct or verify knowledge¸whether that knowledge aids in construction of theory or in the practice of an art". (८)

१0.Redman and Mary define research as a "systematized effort to gain new knowledge". (९)

**१.८ संशोधनाचा अर्थ :** (१0)

काळजीपुर्वक तपासाच्या अथवा सखोल चौकशीच्या साहाय्याने वस्तुस्थिती किंवा तथ्य शोधुन काढण्याच्या शास्त्रीय स्वरूपाचा पध्दतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन म्हणता येते.

---

७.मुळे,रा.श.आणि उमाठे ,"शेक्षणिक संशोधन मुलतत्त्वे"नागपूर,म.वि.ग्रंथालय,२री आवृत्ती,१९८७,पृ.१३

8.The Encyclopaedia of Social Sciences,Vol.9,MacMillan,1930

9.. Kothari,c.r.:Research Methodology:Methods & Techniques new ase international limited ,New Delhi 2008, P.2-5

१0.रिसवडकर,म.रा."संशोधन व्याख्या आणि पद्धती"यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.नाशिक २000,पृ.१

संशोधनाची सुरूवात प्रश्नात्मकतेने होते आणि शेवट हा निष्कर्षाने होतो. संशोधन या संकल्पनेतुन निर्माण झालेली शास्त्रे, त्याच्यासाठी उपयोजलेल्या पध्दती त्यांचे विविध प्रकार, यांची साधन चिकित्सा या सर्व व्यवहारातुन संशोधन विद्या ही संकल्पना सिध्द झालेली आहे.

संशोधन ही फक्त लवचिक विश्वव्यापक अशी संकल्पना किंवा ज्ञान व्यवहारापुरती मर्यादित संज्ञा राहिलेली नसुन संशोधनाचे शास्त्र, विद्या सिध्द झालेली आहे.

संशोधन या शब्दाला इंग्रजी भाषेत 'Research' असे म्हणतात. Re म्हणजे पुन्हा आणि Searchम्हणजे शोधणे. याचाच अर्थ असा की, एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा शोधणे म्हणजे संशोधन होय.

संशोधन म्हणजे अत्यंत पध्दतशीरपणे घेतलेला सत्याचा शोध. ज्ञानाचे क्षेत्र व्यापक करण्याकरिता समस्याचे आकलन व निराकरण करण्याकरिता आणि एकंदर मानवी जीवन प्रगतशील व समृध्द करण्याकरिता संशोधन हे महत्वाचे साधन आहे. ज्ञान मिळविण्यासाठी वैज्ञानिक पध्दतीचा उपयोग करण्याच्या प्रक्रियेला संशोधन म्हणता येईल. संशोधनाची प्रक्रिया वस्तुनिष्ठ असावी लागते तरच संशोधक सर्वार्थी अशा निष्कर्षाप्रत येतो. संशोधन ही समस्या निराकरणाची सुव्यस्थित प्रक्रिया आहे. मानवी मनाला अस्वस्थ करणा-या बहुविद्य समस्यांचा सप्रमाण व विश्वसनीय समाधानासाठी आवश्यक असलेल्या तथ्यांचे संकलन व विश्लेषण करून त्यांचा अन्वयार्थ लावण्याची व्यवस्था व प्रक्रिया म्हणजे संशोधन होय.

सामाजिक शास्त्रातील संशोधन हे वैज्ञानिक पातळीवर संशोधनासारखे प्रयोगाच्या

पातळीवर सिध्द करता येत नाहीत सामाजिक शास्त्रांना ऐतिहासिक महत्व आहे.

विज्ञानाप्रमाणे केवळ तात्विक व पृथक्करणात्मक भुमिकेवरून त्यांचा अभ्यास करता येत नाही. त्यासाठी सदैव ऐतिहासिक व संश्लेषणात्मक दृष्टी स्वीकारावी लागते. उत्तरे शोधण्यासाठी जे प्रश्न पुढे ठेवले जातात त्यांच्या वैशिष्टयावरून संशोधनाचे उद्दिष्ट ठरलेल्या योग्य संशोधनाच्या प्रक्रियेचे स्वरूप निश्चित करता येते.

**१.९ संशोधनाच्या पध्दती :** [११]

संशोधनाच्या विविध पध्दती आहेत. त्यात संशोधनाची उद्दिष्टे, माहिती संकलनाचे तंत्र, साधने, संशोधन क्षेत्र इत्यादीच्या आधारावर संशोधन पध्दतीचे वर्गीकरण केले जाते.

संशोधनाच्या प्रमुख तीन पध्दती आहेत.

१. वर्णणात्मक संशोधन पध्दती

२. ऐतिहासिक संशोधन पध्दती

३. प्रायोगिक संशोधन पध्दती

**प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.**

**१. वर्णनात्मक संशोधन पध्दती :** [११]

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. कारण वर्ण

---

११. रिसवडकर,म.रा. ''संशोधन व्याख्या आणि पद्धती''यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक २000,पृ.७

नात्मक पध्दतीमध्ये संशोधकाने निवडलेल्या कोणत्याही विषयाचा किंवा समस्याचा सर्वकष अभ्यास करण्यात येतो आणि यथार्थ व संपुर्ण माहिती गोळा करण्यात येते. संबंधीत गोळा केलेली माहिती नंतर योग्य अशा वैज्ञानिक पध्दतीव्दारा एकत्रित करण्यात येते आणि त्या माहितीचे तंत्रशुध्द विश्लेषण करून चिकित्सा किंवा स्पष्टीकरण देता येते. म्हणजे विश्लेषणानंतर तत्वचिंतनाने निघालेल्या निष्कर्षावरून संशोधकाला परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी योग्य त्या मार्गदर्शक सूचना करता येतात. विशिष्ट व्यक्तिच्या, समुहाच्या व स्थितीच्या वैशिष्टयाचे व लक्षणाचे यथा तथ्य वर्णन करणे हाच वर्णनात्मक अध्ययनाचा प्रमुख हेतु असतो.

**व्याख्या :**

"कोणत्याही घटनेच्या सामाजिक संस्थेच्या किंवा एखाद्या उपक्रमाच्या सद्यस्थितीचा सर्वकष अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेण्यात येतो व विश्लेषणात्मक वर्णन करण्यात येते अशा सर्व संशोधनास वर्णनात्मक संशोधन म्हणतात."

**वर्णनात्मक संशोधन पध्दतीचे गुण :**

वर्णनात्मक संशोधन पध्दतीचे गुण पुढीलप्रमाणे आहेत.

१.प्रश्नावलीव्दारे वस्तुनिष्ठपणे गोळा केलेली माहिती.

२.गोळा केलेल्या माहितीचे तंत्रशुध्द विश्लेषण.

३.चिकित्सा.

४.चिकित्सेला लाभलेली चिंतनाची पार्श्वभुमी.

**प्रश्नावली :** [१३]

सामाजिक शास्त्रातील संशोधनात प्रामुख्याने पाहणी हे तंत्र माहिती गोळा करण्यासाठी अवलंबावे लागते. पाहणीच्या या सत्रात संशोधक परिस्थितीबद्दल सर्वकष माहिती गोळा करतो. त्यासाठी तो प्रश्नावली आणि मुलाखत ही माहिती गोळा करण्याची साधने वापरतो.

पाहणीसंबंधी हायरस हिल्वे यांनी त्यांच्या “Introduction to Research” मध्ये असे म्हटले आहे की पाहणीव्दारे केवळ सत्यशोधनाचा हेतु सफल होतो असे नसुन पाहणीची परिणीती एखाद्या सिध्दांताच्या मांडणीत किंवा समस्येची उकल होण्यासही होतो. ज्यावेळी पाहणीसाठी निवडलेला लक्षसमुहाचा नमुना भौगोलिकदृष्टया दुरवर पसरलेला असतो तेव्हा प्रश्नावलीव्दारेच माहिती जमा केली जाते.

**प्रश्नावलीची व्याख्या :**

१. बोमर्डस यांच्या मते, “प्रश्नावली म्हणजे भिन्न भिन्न व्यक्तिकडून ज्यांची उत्तरे मागविली जातात अशा प्रश्नांची तालिका होय.” [१३]

२. गुड व हॅट यांच्या मते, “सर्वसामान्यपणे प्रश्नावली हे प्रश्नाचे उत्तर मिळविण्याचे असे एक तंत्र आहे की ज्यात कागदावरील प्रश्नांची उत्तरे उत्तरदाता स्वत: भरतो.” [१४]

प्रश्नावलीमुळे प्रमाणित उत्तरे प्राप्त होतात व ज्यांचा उपयोग सारणीकरण व सांख्यिकीसाठी

---

१३. भिंताडे ,वि. रा. " शैक्षणिक संशोधन पध्दती " पुणे,२०११

१४. कुंभोजकर ,ग.वि."संशोधन पध्दती व संख्याशास्त्र,फडके प्रकाशन,कोल्हापूर २००२ पृ १९

होतो. तसेच प्रश्नावलीमुळे आपल्या संशोधनाची चौकट ठरविण्यात मदत होते.

**प्रश्नावली परिणामकारक होण्यासाठीचे आठ निकष :** [१५]

हिल्वे यांनी प्रश्नावली परिणामकारक होण्यासाठीचे आठ निकष सुचविले आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत.

१.प्रश्नावली फार लांबलचक नसावी.

२.जी माहिती अधिच उपलब्ध आहे त्या माहितीबद्दल विचारणा करू नये.

३.प्रश्नावलीत प्रश्न हे विषयाच्या संदर्भातील महत्वाच्या गोष्टी संबंधीच असावेत.

४.प्रश्न असे तयार करावेत की त्यांना देण्यात येणाय्रा उत्तरातुन वस्तुस्थिती स्पष्ट होईल.

५.उत्तरदात्यांना ज्ञान असलेल्या संज्ञाचाच प्रश्नकर्त्याने वापर करावा.

६.मुद्यानुरूप प्रश्नावलीची वेगवेगळया भागात विभागणी करावी.

७.प्रश्नावली तयार करताना उत्तरदात्याच्या वेळेचे प्रश्नकर्त्याने भान ठेवणे जरूरीचे आहे.

८.उत्तरे कशाप्रकारे नोंदवावीत याबद्दल योग्य त्या सुचना त्यात दिलेल्या असाव्यात.

प्रश्नावली म्हणजे संशोधकाने आपल्या समस्येच्या संदर्भात तयार केलेल्या शिष्ठ क्रमाने मांडलेल्या प्रश्नांची यादी असते. प्रश्नावलीचा उपयोग विशिष्ट व्यवसायी संस्था यांच्या अभ्यासासाठी वापरता येतो. संकलित केलेल्या माहिती विश्लेषणामध्ये ग्रंथपाल प्रश्नावली,

---

१५.कुंभोजकर ,ग.वि."संशोधन पध्दती व संख्याशास्त्र,फडके प्रकाशन,कोल्हापूर २००२ पृ १९

अध्यापक प्रश्नावली व वाचक प्रश्नावलीव्दारे संकलित माहितीचे सादरीकरण केले जाते.

**मुलाखत :**

प्रत्यक्ष माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली बरोबरच मुलाखत हे एक प्रभावी आणि उत्तम साधन आहे. संशोधनासाठी योग्य विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठी समोरा समोर बसून केलेले संभाषण म्हणजे मुलाखत होय. प्रश्नावली तयार करताना जे निकष लावण्यात येतात ते मुलाखतीच्या बाबतीत ही लावावे लागतात. मुलाखत आणि प्रश्नावली यामधील महत्वाचा फरक असा की मुलाखत हे साधन स्थानिक पातळीवर वापरण्यात येते. समोरील व्यक्तीचे अनुभव, भावना, मते, विचार, समस्या इ. विषयी माहिती मिळविल्यास मुलाखत उपयुक्त ठरते.

मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा या दोन्ही व्यक्ती स्पष्ट व गंभीर आणि स्वत:च्या भावनांवर नियंत्रण ठेवणा-या असतील तर मुलाखत अधिक परिणामकारक ठरते. मुलाखतीमध्ये दोन्ही व्यक्तींचा प्रत्यक्ष संपर्क होत असल्याने शंका निरसन ताबडतोब करता येते. मुलाखतीत अभ्यासकाने विचारलेल्या प्रश्नांना मुलाखत देणारी व्यक्ती लेखी उत्तरे देण्याऐवजी तोंडीच उत्तरे देते. म्हणून मुलाखत घेताना प्रश्नकर्त्याने उत्तरे जशीच्या तशी उतरवुन घ्यावीत.

मुलाखतीचा फायदा असा की एखाद्या प्रश्नाबद्दल किंवा मुद्याबद्दल उत्तरदात्याला स्पष्टीकरण हवे असल्यास ते प्रश्नकर्ता लगेच देऊ शकतो. त्यामुळे कोणताही प्रश्न अनुत्तरित राहत नाही. त्याचप्रमाणे मुलाखतीमध्ये प्रश्नकर्ता मिळालेल्या उत्तरावर आधारित उपप्रश्न विचारू शकतो.

## १.१०पूर्वाभ्यासाचे समालोचन ः

पूर्वाभ्यासाचे समालोचन म्हणजे पुर्वी झालेल्या आपल्या विषया संदर्भातील तशी संशोधने झाले आहेत का? याची माहिती जाणून घेणे. तसेच विषयाशी संबधीत सुसंगत व तर्कसंगत पध्दतशीर माहिती कशी घ्यायची व ती कशी अंतर्भूत करायची याची माहिती मिळवणे होय.

संशोधन करीत असताना संशोधकास त्या अभ्यास विषयाच्या अनुषंगाने आढावा घ्यावा लागतो .त्यासाठी प्रकाशित ,अप्रकाशित ,प्रबंध,नियतकालिके अहवाल ,पुस्तके इत्त्यादी साधनांचा वापर करावा लागतो. या मागचा उद्देश म्हणजे संबंधित विषयाची पार्श्व भूमी पाहून त्या मागची संपूर्ण माहिती प्रकाशित करणे होय. यामुळे अभ्यासकास मागील घडामोडीचा अभ्यास करून पुढे चांगल्या निष्कर्षापर्यंत पोचता येते. पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेत असताना मागील संकल्पना ,उपयोगात आणलेली संशोधन पद्धती आणि निष्कर्ष हे पुढील उद्दिष्टे गाठण्यासाठी त्यावर प्रकाश टाकत असतात.

पूर्वी या विषयावर संशोधन झालेले नाही याची संशोधकाने पूर्ण खात्री केलेली आहे आणि त्यानुसारच हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

प्रस्तुत संशोधन पूर्ण करण्यासाठी संशोधकाने संशोधन अभ्यास विषयासंबंधीत खालील प्रमाणे प्रकाशित तसेच अप्रकाशित साहित्त्यांचा आढावा घेतला आहे.

१. शिवशंकर घुमरे,वीर डी. के. आणि कालबांडे (जानेवारी ते मार्च,२०१३,अंक-१)ः-यांनी सादर केलेले संशोधन हे मराठवाडा विभागाचे आहे. हा लेख ग्रंथालय अर्थसंकल्पावर केंद्रित केला आहे. या अभ्यासाचे वेगवेगळे दृष्टीकोन आहेत. त्यांनी मराठवाडामधील ग्रंथालयाचा अभ्यास करताना प्रश्नावली भरून घेऊन त्यामध्ये काय बद्दल करण्याची गरज आहे. हे जाणून घेऊन त्यामध्ये आणखी काय चांगले बद्दल करता येतील हे सुचविले आहे.

२.अतनु दास अणि गायत्री पॉल(सीएलएमएस२०१२):-त्यांनी आपल्या लेखात अर्थ संकल्पाचा अर्थ आणि अर्थसंकल्प तयार करताना वापरले जाणारे तंत्र त्याचप्रमाणे फंडाची वाटणी कशी करावी. गरजेच्या तयारीसाठी कोणत्त्या प्रकारे अर्थसंकल्प अंलबला जावा हे दाखवून शेवटी त्त्यांनी शेवटी असे अनुमान काढले की ग्रंथपालाकडून ठरविक रक्कमेचे उत्तम प्रकारे वापर केला जातो.

३.भुपेंद्र राठा(मार्च,२०१०):-यांनी ग्रंथालयचा अर्थसंकल्प आणि त्याच्यां तंत्राबद्दल अभ्यास करताना पुढील ऊद्दिष्ट मांडली आहेत.

अ. ठरलेल्या वेळेमध्ये उत्त्पन्न आणि खर्च यांचा अंदाज सादर करणे

ब. भविष्यात देण्याता येणाय्रा सेवा समजून त्त्या सादर करणे .

क.अर्थिक निंयत्रण कसे ठेवावे हे जाणून घेणे.

४.जॉन थॉमसन (जुलै,२००७):-यांनी ग्रंथालयाच्या अर्थसंकल्पचा आराखडा आणि अर्थ संकल्पामध्ये वाढ कशी होईल हे त्त्यांनी पॉवर पॉइंट प्रेजेटेशन्स(PPT) मधून सादर केले आहे.

५.राजा तोबिया( जुलै,२००९) :-या मध्ये राज तोबिया यांनी सर्वसाधारण ईलेक्ट्रीक नियतकालीकांसाठी ५%आणि ३-५%पुस्तकांसाठी याप्रमाणे वाढत जाणाय्रा किंमती आणि त्त्यासाठी मिळणारे अर्थसंकल्प यांचा समतोल साधणे कठीण आहे.त्त्यामुळे काही जर्नलस ,ई -जर्नलस आणि पुस्तके कमी करावी लगतात.त्त्यामुळे त्त्यांनी आपल्या संशोधनातून ग्रंथालयाचे अर्थसंकल्प हा वाढत जाणाय्रा किंमतीच्या प्रमाणात वाढत जावे असे सुचवले आहे.

६. संदीपान दगडू तादगे यांनी टिळक महराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत एम.फिल.पदवीकरिता पुणे शहरातील पुणे विद्यापीठ अंतर्गत व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय गंथालयाचे व्यवस्थापन आणि सेवांचा अभ्यास याविषयावर संशोधन केले आहे. (मार्च,२००८)

७.जकोटिया,सी.पी. ( २००९ )ः-''बजेंटिग ॲण्ड बजेटरी कन्ट्रोल '' या लेखाामध्ये अर्थसंकल्पाचा अर्थ,प्रकार आणि त्त्यांचे नियत्रंण याबाबत माहिती देण्यात आली आहे.सदर लेखातून अर्थ संकल्पाबाबतच्या माहिताचा आधार घेण्यात आला आहे.

८.htt:// www.library .ualberta.ca/aboutus/budget/index.cfm

या वेबसाईटवरून अर्थसंकल्पावद्दल माहिती शोधण्यास मदत झाली आहे.

९. http:// www.sinhgad.edu.com.

या वेबसाईटवरून सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी आणि त्त्या अंतर्गत येणाय्रा व्यवस्थापन महाविद्यालयाची माहीती मिळवता आली.

१०. http:// www.scoslibrary . web.com

या वेबसाईटवरून अर्थसंकल्पावद्दल माहिती शोधण्यास मदत झाली आहे.

**संदर्भसुची ः-**

१.गणपुले,श.रा., "ग्रंथालयीन साधनसामग्री आणि सेवा यांचे

व्यवस्थापन",नाशिक¸२000¸पृ.क्र२४-२५

२.कुंभोजकर ,ग.वि.''संशोधन पध्दती व संख्याशास्त्र,फडके प्रकाशन,कोल्हापूर २00२ पृ.क्र १९

३.निकोसे,सत्त्यप्रकाश,''ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती'',नागपुर २00७, पृ.क ३८-३९

४. सुतार,धनंजय.''ग्रंथालय आणि माहितीशास्त्र''सांगली२0११,पृ.क्र.२00६-२00८

५.भागवत,श.ग.''ग्रंथालय व्यवस्थापन''युनिव्हर्सल प्रकाशन,पुणे २00७पृ.क्र६२-७४

६.रिसवडकर,म.रा.''संशोधन व्याख्या आणि पद्धती''यशवंतरा व चव्हाण मुक्त विद्यापीठ.

नाशिक् २000,पृ.क्र.१-१९

७.मुळे,रा.श.आणि उमाठे ,"शेक्षणिक संशोधन मुलतत्त्वे"नागपूर,म.वि.ग्रंथालय,२री

आवृत्ती,१९८७,पृ.क्र.१३

८.कुंभोजकर ,ग.वि.''संशोधन पध्दती व संख्याशास्त्र,फडके प्रकाशन,कोल्हापूर २00२

पृ .क्र.१९

9..Bhusha chrles ,and Harter stephens p., "Research Methodology in Librarianship Thechnique and Interpretation" New Yourk, Academic Press, 1980, p. 3.

10.. Kothari,C.R.:Research Methodology:Methods & Techniques New As International Limited ,New Delhi 2008, P.2-5

## प्रकरण -२ रे

# अर्थसंकल्प म्हणजे काय

२.१ **प्रस्तावना ः-** ग्रंथालयाच्या सेवांमध्ये निवड,खरेदी,वर्गीकरण ,तालिकीकरण, छपाई, बांधणी आणि या संबधित सेवांचा समावेश होतो. या सर्व सेवा देण्यासाठी ग्रंथालयास दिल्या जाणा-या आर्थिक सेवांचा विचार केला जातो. किंवा करावा लागतो.

खरं तर अर्थसंकल्प व ग्रंथालयाच्या व्यवस्थापनांत नेतृत्वाचे किंवा दिशा देण्याचे महत्वाचे काम करत असते. ग्रंथालयाच्या सेवा पुरवण्यासाठी पैशाची खुप मोठी गरज असते म्हणजेच अर्थसंकल्प पाहिजेच असतो. त्याशिवाय ग्रंथालयाच्या सेवा पुरवल्या जाऊ शकत नाहीत.

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे. आजची ग्रंथालये केवळ गंथालय राहिलेली नसून त्यांना माहिती व संदर्भ केंद्र म्हणून कार्य करावे लागते.उच्च शिक्षणामध्ये महाविद्यालयीन ग्रंथालये ही शिक्षणाचा आत्मा आहे. ग्रंथालयाशिवाय अध्ययन व अध्यापनाची प्रक्रिया पूर्ण होऊ शकत नाही ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथ, नियत कालिके, वर्त मानपत्रे व ग्रंथेत्तर साहित्य या माध्यमातून ज्ञान उपलब्ध करून दिले जाते. त्याच बरोबर आता माहिती मिळवण्यासाठी आय.सी.टी.चा खूप मोठया प्रमाणात वापर केला जातो.गंथालय ही संस्था असल्यामुळे उत्पन्न व खर्च यांच्या संबधास वेगळा अर्थ प्राप्त होतो.

ग्रंथालयाच्या विविध कामासाठी पैसा लागतो. व पैसा कोठून येणार, किती येणार, त्याच्या एकून रक्कमेचा अंदाज करणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे खर्चाच्या बाबी कोणत्या, त्यावर किती टक्के अथवा विशिष्ट रक्कम खर्च करावयाची हे करीत असताना जमा व खर्चाचा मेळ घालावा लागतो एखादया ग्रंथालयाचा अर्थसंकल्प म्हणजे ग्रंथालयासाठी

लागणारा खर्च व तो पैसा जमा करण्यासठी साधने यांचा तक्ता होय.सर्वसाधारण सर्वच ग्रंथालयाची पैशाची मागणी जास्त रकमेची असते. परंतु मान्य झालेली रक्कम त्या मानाने तुटपुंजी वा कमी असते म्हणून हा अर्थसंकल्प करून त्याच्या मर्यादेमध्ये खर्च करणे खर्चाच्या प्राधान्य बाबी ठरवणे तसेच उत्पन वाढीचे मार्ग शोधणे आवश्यक ठरते.

अर्थसंकल्प तयार करण्यासाठी साधारणपणे गेल्या वर्षी किती रक्कम कोणत्या बाबीसाठी मान्य झाली व प्रत्यक्ष खर्च किती झाला ही माहिती प्रत्येक संस्थेकडे असते, त्या रक्कमेत १० ते १५ टक्के वाढ करून अर्थसंकल्प तयार करतात.नियतकालिकांच्या वर्गणीमध्ये २० ते २५ टक्के दरवर्षी वाढ होते. सार्वजनिक आणि शैक्षणिक गंथालयातील जमा खर्चाच्या प्रमुख बाबी पुढे दिल्या आहेत.

महागाईमुळे ही वाढ अपरिहार्य असते.परंतु एखादी नवीन योजना सेवा सुरू करावयाची असेल तर प्रथम अशा खर्चाची तरतूद करावयाची असते.त्यास योग्य त्या मंडळाची मान्यता घ्यावी लागते. त्यातून जमा रक्कम किती होणार हे सांगणारी टिपणी सादर करावी लागते.

## २.२ ग्रंथालय म्हणजे काय (१६)

जे ग्रंथभांडार वाचकांच्या उपयोगा करीता जेथे संग्रहीत केले जाते,सुव्यवस्थित लावले जाते, जतन केले जाते अशी संस्था उदयास आली म्हणजे ग्रंथालय होय.

ग्रंथ आणि इतर सर्व प्रकारचे वाचन साहित्य ज्या वास्तूत करून वाचकांना सहजपणे उपलब्ध

---

१६.सातारकर,सु.प्र."ग्रंथालय व्यवस्थापन तंत्र व मंत्र",औरंगाबाद १९९५पृ.१०८-११३.

करून दिले जाते त्या ठिकाणास ग्रंथालय म्हटले जाते. ग्रंथ व अन्य साहित्याद्वारे मानवी संस्कृतीचा वारसा पुढील पिढीकडे सोपविला जातो म्हणजे ग्रंथ आणि ग्रंथालयाचा इतिहास अभ्यासावयाचा असेल तर आपणास मानवी संस्कृतीचा इतिहास अभ्यासाव लागतो. तर मानवी संस्कृतीचा इतिहास अभ्यासावयाचा असेल तर ग्रंथ अभ्यासावे लागतात. ग्रंथामधून मानवी विचारांचे आदान प्रदान होते लेखकाच्या मनातील विचार ग्रंथरूपाने प्रकट होतात. ग्रंथाच्या प्रसिध्दीसाठी प्रकाशक कार्य करतात . ग्रंथ विक्रेत्याच्या सहाय्याने ग्रंथ ग्रंथालयात येतात आणि ग्रंथालयाच्या माध्यमातून ग्रंथाचा लेखक व वाचक यांची गाठ पडेल व लेखकाचा वाचकाशी संवाद साधण्याचा हेतू साध्य होतो.ज्ञानप्राप्तीसाठी ग्रंथाचे वाचन करणे,मनोरंजनासाठी गंथाचे वाचन करणे या अन्य कोणत्याही हेतु असो ग्रंथासारखा अन्य मित्र मिळणे शक्य नाही ग्रंथ हीन ज्ञान वाचक त्याच्या मनात येईल त्या कोण्त्याही वेळी, कोण्त्याही प्रसंगी मिळवू शकतो.म्हणूनच न.शे.पोहनेरकर यांनी म्हटल्यानुसार

"गुरू ते खरे ग्रंथ या मानवाचे

म्हणूनच ते मोल ग्रंथालयाचे"

ग्रंथामधून वाचक ज्या व्यक्तीचे अनुभव अभ्यासत असतो त्यास कदाचित वाचकाने पाहिलेले नसते.विवेकानंद, ज्ञानेश्वर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर असो की महात्मा गांधी हे सर्व त्यांच्या साहित्यामुळे विचाारामुळे अजरामर झाले आहेत.त्यांचे विचार ग्रंथाद्वारेच जगभर पोहोचले म्हणूनच ग्रंथाचे महत्व मानवी जीवनात अनन्यसाधारण आहे.

मानवी जीवनास अर्थ प्राप्त करून देणा-या या महत्वाच्या घटकांचा संग्रह या द्वष्टीने आपण ग्रंथालयाकडे पाहिले म्हणजे ग्रंथालयांचे महत्व आणखीच ठळकपणे नजरेत भरते

यावरून ज्या समाजात ग्रंथ आणि ग्रंथालयाची प्रगती झाली आहे तो समाज प्रगत विचारांचा आहे असे समजणे योग्य ठरेल म्हणूनच मानवी प्रगतीची साखळी मानली जाते.

## २.३ ग्रंथालयाच्या व्याख्या

१ "निवडक ग्रंथाचा व ज्ञान प्राप्तीसाठी लागणा-या इतर साधन सामूग्रीचा उपयुक्ततेसाठी करण्यात आलेल्या व संग्रह केलेल्या ठिकाणास ग्रंथालय असे म्हणतात. [१७]

२. ग्रंथालय म्हणजे विश्वातील सर्व ज्ञानाच्या दस्तऐवजाचे कोठार होय. [१७]

3.ग्रंथालय म्हणजे समाजाचे ज्ञानरूपी ह्रदय होय. (डॉ. राधाकृष्णन) [१८]

"Library is heart of society"

४. ग्रंथालय हे ज्ञान प्रसाराचे केंद्र आहे. [१९]

"Library is a centre of information dissemination."

५."ग्रंथ आणि सर्वप्रकारचे साहित्य ज्या वस्तुत जतन करून दिले जातात त्याला ग्रंथालय असे म्हटले जाते." ग्रंथ आणि अन्य सर्व प्रकारच्या साहित्याद्वारे मानवी संस्कृतीचा वारसा पुढील पिढीकडे सोपविला जातो. ग्रंथामधूनच मानवी विचारांचे अदान-प्रदान होते. लेखकाच्या मनातील विचार ग्रंथरूपाने प्रकट होतात. ग्रंथाचे वाचन ज्ञानप्राप्तीसाठी, मनोरंजनासाठी किंवा अन्य कोणत्याही हेतूसाठी असो ग्रंथासारखा अन्य मित्र मिळणे शक्य नाही. ग्रंथातील ज्ञान वाचक त्यांच्या मनात येईल तेव्हा मिळवू शकतो. [२]

---

१७. सुतार,धनंजय. ''ग्रंथालय आणि माहितीशास्त्र"सांगली२०११,पृ. २००६-२००८.

१८. क-हाडे,वी. एम. ''शास्त्रीय संशोधन पद्धती" पिंपळापुरेॲण्ड कं. पब्लिशर्स,नागपूर पृ. १-१२

१९. Mishra,k,c. ''२१ century library management" p.63

क्रमिक पुस्तके,संदर्भ ग्रंथ, नित्य नवी माहिती देणारी नियतकालिके,दृकश्राव्य आणि तांत्रिक साधने, यांच्या माध्यमातून वैचारिक वातावरण निर्माण होते.ग्रंथ वाचनाच्या माध्यमातून वाचकांचा अज्ञानरूपी अंधकार दूर होतो. त्याला नवे ज्ञान व नवी माहिती मिळत असते. म्हणून ग्रंथ हे मानवाचे गुरू आहेत.वाचन हा सत्यशोधनात प्रवास असतो ज्या देशातील नागरिक, लेखक, विचारवंत, शास्त्रज्ञ, वकील, डॉक्टर, वकील,नेते, वैज्ञानिक व तरूण वाचनाची आवड जागरूकतेने जोपासतात ते राष्ट्र जगावर अधिराज्य गाजवू शकते. नेत्रदिपक प्रगती व उज्जवल भविष्य घडवू शकते.काळाच्या गतीने ते विकासाची गती राखू शकते.कारण त्यांचे ज्ञान पाणी साचलेल्या गढूळ डबक्याप्रमाणे न राहता प्रवाही व संपन्न असते.वाचनामुळे मन व बुध्दी प्रगल्भ होते.चौफेर वाचनामुळे ज्ञानात भर पडते.कृती विचार परिपक्व व स्पष्ट होतात. अज्ञानाची जळमट दूर होतात. वाचनामुळे जीवनातील मन बुध्दीची मशागत होते. वाचनामुळे जीवनातील अडचणी संकटे व दुख यांना तोंड देण्याचे बळ तथा धैर्य मिळते तसेच स्वाभिमान जागृत होतो.ग्रंथालय हे एखादया कार्यशाळेसारखा अनुभव देण्यास समर्थ असते. म्हणूनच ग्रंथालयाचे स्थान हे फार महत्वपूर्ण आहे.

## २.४ अर्थसंकल्प म्हणजे काय [२०]

उत्पन्न आणि खर्च याबाबतीतील विशिष्ट कालावधीत अंदाज देणारे पत्रक म्हणजे 'अर्थ संकल्प' होय.उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ बसवून खर्चावर नियंत्रण ठेवण्याकरिता अर्थ संकल्प उपयुक्त ठरतो. अर्थसंकल्प हे व्यवस्थापनाचे महत्वपूर्ण कार्य मानले जाते.एखादया

---

२०.भागवत,श.ग."ग्रंथालय व्यवस्थापन"युनिव्हर्सलप्रकाशन,पुणे २००७पृ.६२-७४

संस्थेतील विशिष्ट कालावधीतील उत्पन्न आणि अपेक्षित खर्च यांचा अंदाज व्यक्त करणारा अराखडा म्हणजे अर्थसंकल्प .

ग्रंथालयात विविध कामासाठी पैसा लागतो . हा पैसा कोठून येणार, किती येणार त्याच्या एकूण रक्कमेचा अंदाज करणे आवश्यक असते . त्याचप्रमाणे खर्चाच्या बाबी कोणत्या त्यावर किती टक्के अथवा विशिष्ट रक्कम खर्च करावयाची हे करीत असताना जमा व खर्चाचा मेळ घालावा लागतो . एखादया ग्रंथालयाचा अर्थसंकल्प म्हणजे ग्रंथालयासाठी लागणारा खर्च व तो पैसा जमा करण्याची साधने यांचा तक्ता होय . सर्वसाधारण सर्वच ग्रंथालयाची पैशाची मागणी जास्त रकमेची असते . परंतु मान्य झालेली रक्कम त्या मानाने तुटपुंजी वा कमी असते म्हणून हा अर्थसंकल्प प्रत्येक वर्षी वाढत गेलेला दिसून येतो . त्या मर्यादिमध्ये खर्च करणे ,खर्चाच्या प्राधान्य बाबी ठरविणे तसेच उत्पन्न वाढीचे मार्ग शोधणे आवश्यक ठरते .

ग्रंथालय व्यवस्थापनात वित्त हे जणू क्रेंद्रस्थानी असते . ग्रंथालयाचे सर्व व्यवहार पैशाभोवती फिरत असतात . पुरेसे आर्थिक पाठबळ नसेल आाणि मिळणारा पैसा नीट वापरला गेला नसेल तर पैशाचा दूरपयोग होईल व ग्रंथालयाच्या सेवेवर त्याचा परिणाम झालेला दिसून येईल .

## २ . ५ अर्थसंकल्पाची व्याख्या

ग्रंथालयांचे यशस्वी व्यवस्थापन करण्यासाठी ग्रंथालयातील सर्व विभाग व घटकांच्या संदर्भात व्यवस्थापनाची कार्ये करावी लागतात वाचनसाहित्याची खरेदी ,कर्मचाय्रांच्या कामाचा मोबदला यंत्रे व इतर साधनांची खरेदी तसेच कर्मचाय्रांकडून आवश्यक त्या प्रक्रिया करवून घेण्यासाठी वित्ताची आवश्यकता असते . ग्रंथालयात वेळोवेळी आवश्यक असलेले अर्थसहाय्य (भांडवल मिळवण्यासाठी,त्याचा व्यवस्थित उपयोग करण्यासठी तसेच कमी किंवा अधिक

स्वरूपातील वित्त उपलब्धतेमुळे उद्‌भवणाय्रा समस्या टाळण्यासाठी भांडवलाचा अपव्यय टाळण्यासाठी आणि ग्रंथालयीन सेवा व उत्पादने यांचा खर्च नियंत्रित ठेवण्यासाठी करण्यात येणाय्रा सर्व व्यवस्थापन कार्याचा(उदाःनियोजन, संघटन, नियंत्रण इ.) समावेश वित्तिय व्यवस्थापनामध्ये होतो.

१.किसन आणि हॉबर -"विवक्षित कालावधीसाठी उत्पन आणि खर्चाचे विवरण देणार तो अर्थ संकल्प." [२१]

२.डिमॉक यांच्या मते - "एका विशिष्ट कालावधीसाठी खर्च आणि उत्पन्नाचे केलेले संतुलन म्हणजे अर्थसंकल्प होय." [२२]

३.हॉरलॉड आर बूस यांच्या मतानुसार - "अर्थसंकल्प म्हणजे एखादया संघटनेचे अंदाजित उत्पन्न तसेच, प्रस्तावित खर्चाची वित्तीय घोषणा आहे,जी आगामी वर्षासाठी पूर्वीच तयार केली जाते." [२३]

४.टेलर यांच्या मते - "एका निश्चत काळासाठी केलेली आर्थिक योजना म्हणजे अर्थसंकल्प होय." [२४]

---

२१.भागवत,श.ग."ग्रंथालय व्यवस्थापन"युनिव्हर्सलप्रकाशन,पुणे २००७पृ.६२-७४

२२.महाजन,शां.ग."ग्रंथालय व्यवस्थापन" पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन,पुणे २००७ पृ.३८-४१

२३.Mishra,k,c. "२१ century library management" p.63

२४.गणपुले,श.रा., "ग्रंथालयीन साधनसामग्री आणि सेवा यांचे व्यवस्थापन", नाशिक, २०००, पृ.क्र. २४-२५

## २.६ अर्थसंकल्पाच्या पध्दती:- (२५)

अर्थसंकल्पाचे विविध प्रकार ते तयार करण्याच्या पध्दतीनुसार तसेच त्याचे स्वरूप, क्षेत्र, उद्देश इत्यादीच्या आधारानुसार पडतात.

१. पांरपारिक पध्दती (Traditional Method)

२.दरडोई पध्दती ( Per Capita Method)

३.हिस्सेवारी पध्दती (Proportional Method)

४.तपशीलवार पध्दती (Method of Details)

५.कार्यधारित अर्थसंकल्प (Performance Budget)

६.कार्यक्रमाधारित अर्थसंकल्प (Programme Budget)

७.कार्य-कार्यक्रमाधारित अर्थसंकल्प (Performance and Programme planning Budget)

८.शून्यधारित अर्थसंकल्प (Zero Budget)

या अर्थसंकल्पाच्या विविध पध्दतीआहेत.या मधील आपण प्रचलित पध्दती आपण पाहणार आहोत.

### १.पारंपारिक पध्दती (Traditional Method)

पारंपारिक पध्दतीने बनविलेल्या आपल्या अर्थसंकल्पाकात जमेच्या व खर्चाच्या अशा दोन बाजू असतात.त्या दोहोंतील पहिले काही घटक हे स्थायी स्वरूपाचे असतात.उदा.जमेच्या बाजूस मातृसंस्थेकडून मिळणारे अनुदान सरकारकडून मिळणारे अनुदान इतर संस्थांकडून (UGC,DST) सारख्या निमसरकारी किंवा IDRC सारख्या सेवाभावी(NGO) किंवा व्यापारी संस्था कडून मिळणाय्रा देणग्या प्रतिलिपी सेवे मधुन घेणारे उत्पन्न विलंब शुल्क वा रद्दी विकुन येणारे उत्पन्न इत्यादी खर्चाच्या बाजुस

२५.गणपुले,श.रा., "ग्रंथालयीन साधनसामग्री आणि सेवा यांचे व्यवस्थापन", नाशिक, २०००, पृ.क्र. २४-२५

सेवकांचे पगार, वीज, पाणी व टेलिफोन इत्यादी सुविधासाठीचा खर्च इमरत दुरूस्ती आणि ग्रंथ नियतकालिके यांच्या सुविधासाठीचा खर्च या स्थायी बाबीमध्ये जमेच्या वा खर्चाच्या एकुण ९0 टक्के वा त्याहुनही जास्त रक्कम विहित होते.उरलेल्या पैकी काही आकस्मिक म्हणजे दर वर्षी न करावे लागणारे पण कालांतराने करावे लागणारे खर्च उदा.इमारतीची रंगरंगोटी यात आणखी ३ते४ टक्के जातात. म्हणजे नविन योजना बसवाव्या लागतात.

**२. दरडोई पध्दती (PERCAPITA METHOD):-**

प्रमाणभुत ग्रंथालय सेवा देण्यासाठी दरमाणशी काही रक्कम खर्च करायला हवी .जितका समाज अधिक सुशिक्षित सुसंस्कृत होईल तितका वाचन साहित्यावरील खर्च अधिक वाढत जाणार हे स्पष्ट आहे समाजशास्त्रज्ञाच्या मते ज्ञानप्रसारासाठी नवसाक्षर आणि प्रौढांसाठी आधिक खर्च करावयास हवा. १९६३ मध्ये डॉ. रंगनाथन यांनी दर व्यक्ती मागे ५0 पैसे खर्च करावेत असे म्हंटले होत. आता त्या मानाने वाचन साहित्त्याच्या किंमती वाढल्या आहेत. शिवाय साक्षरता प्रसारामुळे सुशिक्षित लोकांचे प्रमाण देखील वाढले आहे. त्या मुळे या प्रमाणात वाढ करावी लागेल.विद्यापीठ अनुदान मंडळाने(१९५७-ग्रंथालय समिती) प्रत्त्येक विधार्थ्यामागे रू.१५ आणि अध्यापकामागे रू.२00खर्च करावेत अशी शिफारस केली होती. कोठारी शिक्षण आयोगाने(१९६४-६६)प्रत्त्येक विधार्थ्यामागे रू.२५ आणि अध्यापकामागे रू.२00अशी शिफारस केली होती.

**३. हिस्सेवारी पध्दती (PROPORTIONAL METHOD):-**

विविध पातळीवरील खर्चापैकी किती ठराविक हिस्सा स्थानिक राज्यसंस्था किंवा मध्यवर्ती शासनाने शिक्षणाच्या अर्थसंकल्पातील किमान ६%रक्कम ग्रंथालय सेवेसाठी बाजूला काढून ठेवावी अशी डॉ. रंगनाथन यांनी शिफारस केली होती राधाकृष्णन आयोगाने(विद्यापीठ शिक्षण आयोग)विद्यापीठाच्या एकूण रक्कमेच्या६.५%रक्कम विद्यापीठ ग्रंथालयावर खर्च करावेत असे सुचवले आहे.हा खर्च ६.५% ते १0% वाढवावा.

**४ . तपशीलवार पध्दती ( Method of Details):-**

यापध्दतीत प्रत्त्येक बांबीचा तपशीलवार अंदाज घेताला जातो . डॉ . रंगनाथन यांनी सुचवल्या प्रमाणे प्रथमता आवर्ती व अनावर्ती असे दोन भाग पाडावेत . ग्रंथालय प्रकारानुसार सेवक वर्गाची पदे(post) वेतनश्रेणी, सेवकसंख्या, महागाई भत्ता इत्त्यादी बाबी संबधी खर्चाचा अंदाज घ्यावा . या नंतर वाचन साहित्त्य ग्रंथबांधणी ग्रंथाची निगा इत्त्यादी बाबीसाठी तितकीच_रक्कम घ्यावी . अशा प्रकारे आवर्ती खर्च काढावा . अनावर्ती खर्चात इमारत, फर्निचर ,उपकरणे वगैरे बाबींचा विचार करावा . या पध्दतीचा वापर करावा असे सुचविण्यात आलेआहे .

या पध्दतीपेक्षा आता अर्थसंकल्पाच्या नवीन पध्दती प्रचारात आहेत . त्यानुसार अर्थसंकल्प तयार केला जातो .

**५ . कार्यद्यारित अर्थसंकल्प (Performance Budget):-**

कार्याधारित अर्थसंकल्पामध्ये उद्देश किंवा ध्येयप्राप्तीवर अधिकभर देण्यात येतो . अशा प्रकारच्या अर्थसंकल्पात योजना तसेच त्याच्या पूर्तता स्पष्ट केलेल्या असतात . कार्यक्षमता आणि कार्यकमाची परिणामकारकता यावर हा अर्थसंकल्प आधारित असतो . ग्रंथालयातील कार्यक्रमाप्रमाणे अर्थसंकल्प तयार केला जातो . परंतू कार्यक्रमा ऐवजी कार्यक्रम किती कार्यक्षमतेने केला जातो यावर भर देण्यात येतो . कार्यक्षमतेचे मोजमाप करण्याकरिता खर्च व नफा पृथकरण या तंत्राचा आधार घेतला जातो .

**६ . कार्यक्रमाधारित अर्थसंकल्प (Programme Budgeting):-**

उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हाती घेतलेला उपक्रम किंवा कार्यक्रमाचा संच यामध्ये समाविष्ट असतो . प्रत्येक कार्यक्रमाची निश्चीत फलनिष्पती असते . काही कार्यक्रम दुसऱ्या कार्यक्रमाला मदत किंवा आधार म्हणून हाती घेतले जातात उद्दिष्टांशी संबंधित अनेक कार्यक्रम असू शकतात . त्यांची उद्दिष्टे असतात परंतु त्याची साधने मात्र वेगळी असू शकतात .

**७ . कार्यक्रम नियोजनावर आधारित अर्थसंकल्प ( Programme Planning Budget System ):-**

चार्ल्स हिव यांनी १९६१ मध्ये अमेरिकेच्या संरक्षणखात्यात या पध्दतीचा प्रारंभ केला . तिच्या सफलतेमुळे शिक्षणक्षेत्र, आरोग्यखाते, ग्रंथालय व्यवस्थापनात या पध्दतीचा वापर सुरू झाला . व्यवस्थापनतज्ञ हॅरॉल्ड कुन्टझ यालाच कार्यक्रमाधारित अर्थसंकल्प म्हणतात . तर ग्रंथालयशास्त्रज्ञ जी . ई . इव्हान्स कार्यक्षमतेवर आधारित अर्थसंकल्पालाच 'कार्यक्रम व नियोजनाधारित अर्थसंकल्प' म्हणतात . इव्हान्स यांच्या मते कार्ये, अपक्रम व प्रकल्पावर हा अर्थसंकल्पावर आधारित असतो . पारंपारिक अर्थसंकल्पात रक्कमेचे वाटप विवक्षित शीर्षका खाली केले जाते . तर या अर्थ संकल्पात नियोजनातील संकल्प पूर्ण करण्यासठी कायक्रमा धारित वाटप केले जाते . खर्च व नफा यांचे विश्लेषण करून सर्वोत्कृष्ट व स्वस्त मार्ग म्हणून या पध्दतीकडे पाहिले जाते . सेवा कितपत उपयुक्त ठरतात . उपभोक्ते (Users) किती समाधानी होतात यावरून फायदा मोजला जातो . ही पध्दती कित्येक शैक्षणिक व सार्वजनिक ग्रंथालयांत अवलंबिली जाते . या पध्दतीचा अवलंब करावयाचा असेल . तर विशेषतः कार्यघटक मूल्याच्या (Unit Cost) – बाबतीत बराच तपशील आवश्यक असतो . या अर्थसंकल्प पध्दतीत उद्दिष्टे, कार्यक्रम साधनसामग्री व त्यांची फलनिष्पती अशी मांडणी केली जाते .

<u>**उदिदष्ट (Objectives)**</u> – या अर्थसंकल्प पध्दतीची कार्यवाही करण्यासाठी ग्रंथालयाची उद्दिष्टे शक्य तितकी सुस्पष्ट हवीत ही उदिदष्टे साध्य करण्यासाठी यथायोग्य आराखडा तयार करायला हवा . उदा . समजा, महाविद्यालयीन ग्रंथालयाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातील वाचनसाहित्य उपलब्ध करून देणे हे असेल,तर त्या दृष्टीने, नियोजन करावे लागेल . महाविद्यालयातील निरनिराळया वर्गातील विदयार्थीसंख्या ,अर्थसंकल्पात पाठयपुस्तकांसाठी लागणारी तरतूद यांचा विचार करावा लागेल . त्यात देखील प्रत्येक विषयासाठी तरतूद करावी लागेल . पाठयपुस्तकांवर अधिक प्रमाणावर खर्च करावा लागतो त्यामुळे काही ग्रंथालये पाठयपुस्तकांसाठी अर्थसंकल्पात वेगळी तरतूद करतात .

**कार्यक्रम साधनसामग्री (Resources) –** कार्यक्रमासाठी लागणारी साधनसामग्री व सेवा यांचा विचार केला जातो. तात्त्विकदृष्टया ग्रंथालयातील कोणत्याही कामासाठी वेळ व खर्चाचा अंदाज घ्यावा लागतो. कार्यक्रमाच्या साधनसामग्रीचे मूल्य म्हणजे त्या कार्यक्रमासाठी होणारा खर्च होय. शिवाय कामाचे तास व प्रक्रियेसाठी लागणारा खर्च यावरून एखादया कामासाठी किती खर्च किती वेळ व किती सहकारी लागतील याचा अंदाज करता येईल. सहकाय्रांची संख्या ठरविण्यासाठी रोजचे कामाचे तास,यावरून एक व्यक्ती वर्षाचे किती तास काम करू शकेल हे कळेल व खर्चाचा देखील अंदाज करता येईल व यावरून एखाादया कामाला त्याच्यातील विविध प्रक्रियांना लागणारा वेळ व त्यावरून किती सहकारी लागतील हे कळून येईल.

**फलनिष्पती –**

कार्यक्रमाचे उद्दिष्ट कितपत साधले आहे किंवा सफल झाले आहे याचे हे एक प्रमाण आहे. प्रत्येक कार्यक्रमापासून होणारा फायदा हेच त्या कार्यक्रमाच्या उपयुक्ततेचे परिणाम आहे.

विस्तारित कालावधी (Extended Time Horizon):

साधारणपणे कार्यक्रमाधारित अर्थसंकल्प व त्यांच्या विश्लेषणासाठी पाच वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधी असावा. भविष्यकालीन कार्यक्रमाच्या पर्यायाचे खर्च – नफा विश्लेषण करून पारख करणे हे ध्येय असते. कार्यक्रमाचे खर्च – नफा विश्लेषण हे तुलनात्मता दर्शविते. परिपूर्ण अचूकता या बाबतीत शक्य नसते. विविध पर्यायांच्या बाबतीत सातत्य हे अधिक महत्वपूर्ण असते.

खर्चाच्या अंदाजाचे सातत्य टिकवायचे असेल ,तर संपूर्ण कार्यक्रमाचा व त्याच्या पर्यायांच्या खर्चा चा पुरेपुर अंदाज हवा. या सर्वाबरोबर निवेदनपत्रिका आवश्यक ठरते. निवेदन पत्रिका ही कार्य क्रमातील विश्लेषण करणारे व निर्णय प्रक्रिया गटातील विश्लेषण करणारे यांना जोडणारी संवादाची साखळी ठरते. या अर्थसंकल्प पध्दती मागील मूलभूत कल्पना म्हणजे साधनसामग्रीचा परिणामकारक

किंवा प्रभावी वापर होय. कार्यक्षमता,खर्चाची परिणामकारकता आणि खर्च नफा ,विश्लेषण ही तंत्रे प्रत्येक कार्यक्रमाच्या खर्चाच्या अंदाजासाठी वापरली जातात.

कार्यक्रम कमीत कमी खर्चात साध्य होण्यासाठी पैशाचे वाटप काटेकोरपणे केले जाते. उद्दिष्टपूर्ती साठी उपलब्ध असलेले विविध पर्याय खर्चाच्या दृष्टीकोणातून काळजीपूर्वक पाहिले जातात.कार्य क्रमाच्या आवश्यकतेसाठी लागणारे पर्याय उपल्ब्ध साधनसामग्रीचा,खर्चाचा विचार करून निवडले जातात. या पध्दतीचा फायदा हा , की ग्रंथालयाचे सेवाकार्य अर्थसंकल्पात प्रतिबिंबित होते. पैशाची मागणी कशासाठी आहे. याची वित्तसमितीला कल्पना येते पैशाचा वापर कशासाठी केला जाणार आहे त्यात संपूर्ण कार्यक्रमाला बाधा न आणता कपात करता येईल का हे देखील कळू शकते. अर्थ संकल्पीय नियंत्रण व नियोजनासाठी ही पध्दती एक उपयुक्त साधन आहे.

सेवा उपक्रमाच्या संख्यात्मकतेवर भर हा या पध्दतीचा प्राथमिक दोष आहे.तुलनात्मक मुल्यांकन व गुणात्मकतेचे समर्थन अपेक्षित असते.जे खरोखरच यात प्रतिबिंबित होऊ शकत नाही.शिवाय पुन्हा खऱ्या किंमतीचा प्रश्न मोठा असतो लहान ग्रंथालयात दैनंदिन कामकाजात पुनरावृत्ती कमी असल्याने ही पध्दती लागू करणे कठीण थोडक्यात सांगायचे झाल्यास खालील गोष्टीचा या पध्दतीत अभाव दिसतो.

रचने खेरीज यामध्ये क्रांतिकारी असे काही नाही उत्तम निर्णय , अनुभव किंवा ज्ञानाला हा पर्याय नाही. निर्णयप्रक्रियेच्या संगणकीकरणाचा हा प्रयत्न नव्हे. काटकसर व कपात यासाठी हा पर्याय नाही प्रत्येक आर्थिक बाबींशी संबंधित समस्येवर हा इलाज नाही.

आपली परिस्थिती, सेवा, प्रधान्यता (Priorities) व खर्च यासाठी अर्थसंकल्पाच्या व्यवस्थापकांना बारकाईने विचार करण्याची सक्ती करणारा हा एक मार्ग आहे.असे जी.ई. इव्हान्स यांचे मत आहे.

## ८.शुन्याधारित अर्थसंकल्प (Zero Based Budget):-

१९७0 मध्ये टेकसास इन्सुमेंतस इन्स. या संस्थेत पीटर फियॉर यांनी शुन्याधारित अर्थसंकल्प पध्दती सुरू केली.नंतर १९७७ मध्ये अमेरिकन सरकारने ही पध्दती अनुसरली , फियॉर यांनी ही पध्दती प्रभावी नियोजन व आर्थिक नियंत्रणाचे अधिक चांगले साधन वाटल्याने त्यांनी ही पध्दती विकसीत केली.

गतवषीच्या अर्थसंकल्पावर आधारित लाईन अर्थसंकल्पा प्रमाणे किंवा पी.पी.बी.एस मधील प्रस्थावित कामकाजाला अनुसरून अर्थसंकल्प करणे या प्रकियेसं कल्पपूर्तीसाठी विविध कामांची यादी करण्यापासून शुन्याधारित अर्थसंकल्पाला सुरूवात केले जाते.या पध्दतीमध्ये नावा प्रमणे शुन्य आधार मानून अर्थसंकल्प मांडला जातो.मागील वर्षाची आकडेवारी विचारत घेतली जात नाही .ग्रंथालयाच्या आर्थिक गरजा दर वर्षी नव्याने विचारात घेतल्या जातात मागील वर्षाचा उपक्रम योग्य वाटत नसेल तर बंद केला जातो.व नवीन कार्यक्रम सुरू केले जातात.या पध्दतीच्या कार्यावाहीत खालील बाबींचा विचार केला जातो.रचना,आराखडा नियोजन आणि नियंत्रण.

या पध्दतीचा आराखडा शून्याधिष्ठित पाया धरून तयार केला जातो.ज्या द्वारा उदिदष्ट साध्य करावयाचे असते. त्याचा आराखडा(उपक्रम,उप - उपक्रमयाचां) तयार केला जातो.प्रत्येक उपक्रमासाठी एक कार्यवाही निवेदन (outcome statement) तयार करावे लागते त्त्या नंतर प्रत्त्येक उपक्रम पार पडेपर्यंत लागगणा-या खर्चाचा अंदाज घ्यावा लागतो. समजा तुम्ही एखादया महाविधालयीन ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल आहात. ग्रंथालयच्या विदयार्थी वाचकांना ग्रंथालयच्या वापराचे प्रशिक्षण दयावयाचे कार्य तुमच्यावर सोपविलेले आहे. याचे निष्पती निवेदन खालील प्रमाणे होईल विदयार्थी वाचकांना ग्रंथालयचा वापर करण्याचे

प्रशिक्षण दिलेले आहे,प्रत्येक कार्यांचे विविध उपकार्यांचे विभाजन केले जाते. विदयार्थी वाचकांना ग्रंथालयच्या वापराचे प्रशिक्षण याचे उपकार्य 'ग्रंथालयीन तालिका वापर' होईल. नियोजन प्रकियेत प्रत्येक उपकम,उप - उपकम व उप - उप-उपकम यानां लागणरा खर्च व त्यांच्या पर्यायांचा विचार केला जातो. अशा रीतीने प्रत्येक कामाचे किमान तीन आराखडे तयार केले जातात. एकूण खर्चात कपात करण्यासाठी. दुसरा– चालू खर्चाची पातळी स्थिर राखाण्यासाठी व तिसरी खर्चाची पातळी वाढवण्या साठी असे तीन आराखडे करतात. शेवटी खर्चाच्या दृष्टीने सर्वात सोयीस्कर आराखडा निवडला जातो. निवडण्यापुर्वी या आराखडयांचे पुननिरीक्षण,त्यामध्ये सुधारणा किंवा बदल पुनरानकम विविध पातळयांवर केले जाते. या अर्थसंल्पपची कर्यावाही वेळ मोडणारी आहे. आराखडा व त्याबाबतचे प्रश्न हे सफलतेच्या दृष्टीने निर्णयक असतात. पण त्यासाठी आवश्यक तो वेळ व लक्ष देता येत नाही.

या पध्दतीचे फायदे खालील प्रमाणे आहेत.

१. उपक्रमांचे पर्याय निवडता येतात.

२. जे उपक्रम समर्थनी असतात तेच अर्थसंकल्पात समाविष्ट केले जातात.

३. सेवेची गुणवत्ता व पातळी यांचा परस्पर संबध व त्यासाठी लागणा-या खर्चाची तरतूद अगोदरच केलेली असते.

या पध्दतीचा प्रमुख फायदा हा की. व्यवस्थापकाला प्रत्येक कार्यकमाचा नव्याने विचार करावा लागतो असे केल्यामुळे व्यवस्थापक प्रस्थापित कार्यकम, त्याचा एकुण खर्च व त्याचबरोबर नवीन कार्यकम व त्याचा खर्च याचे पुनर्निरीक्षन करू शकता.

## २.७ ग्रंथालयामध्ये अर्थसंकल्पाचे महत्त्वः- [२६]

१.ग्रंथालये हया सेवा देणा-या संस्था असून' नफा मिळविणे' हे तत्त्व त्यांना लागू पडत नाही. त्यामुळे त्यांच्याकडून भरपूर उत्पन्न मिळत नसल्याने उपलब्ध निधीचा प्रभावी वापर करण्यासाठी वित्त व्यवस्थापन उपयुक्त ठरते.

२. ग्रथालयास ग्रंथांच्या व इतर वाचनसाहित्त्यांच्या सतत वाढत्त्या किंमतीमुळे तसेच उपलब्ध निधी मर्यादित स्वरूपात असल्यामुळे ग्रंथालयीन सेवा योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी करिता वित्तीय व्यवस्थापन महत्त्वाचे ठरले.

३.वित्तिय व्यवस्थापना शिवाय ग्रंथालयीन कार्ये पार पाडणे वाचकांकरिता कल्याणकारी योजना राबविणे तसेच प्रशासकीय यंत्रणा चालविणे शक्य नसते.

४. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे अदयावत सेवा व वित्तीयव्यवस्थापन उपयुक्त ठरते.

५.आधुनिक प्रकल्प व योजना यशस्वी करण्याच्या दृष्टीने देखील विविध व्यवस्थापनाला प्राप्त झाले आहे.

६. ग्रंथालय ही वर्धिष्णु संस्था असल्याने ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह. सेवकवर्ग तसेच ग्रंथालयीन सेवा व इमारतही वाढत असते. या सर्वांसाठी वाढीव खर्चाची तरतूद करण्यासाठी वित्तीय व्यवस्थापन आवश्यक आहे.

७. भांडवली व नित्त्य स्वरूपातील खर्चाचे व्यवस्थापन समाविष्ट होते.

---

२६.सातारकर,सु.प्र."ग्रंथालय व्यवस्थापन तंत्र व मंत्र",औरंगाबाद १९९५पृ.१०८-११३.

ग्रंथालयीन खर्चा बाबतीत आणखी एक महत्त्वाची बाब आहे ती म्हणजे ग्रंथालय प्रकारानुसार प्रत्येक ग्रंथालयाची वित्तव्यवस्था भिन्न असते. शैक्षणिक व विशेष ग्रंथालयांच्या बाबतीत त्यांच्या पितृसंस्थांच्या अर्थसंकल्पात ग्रंथालयांच्या खर्चाची तरतूद केलेली असते. सर्वजनिक ग्रंथालय ही स्वतंत्र संस्था असल्याने संस्थेचा अर्थसंकल्प असतो.

**१. शैक्षणिकग्रंथालये ः-**

शालेय ग्रंथालयेः-विदयार्थ्यांना वाचनाची सवय लागावी हा ग्रंथालयाचा उद्देश असतो. यासाठी शालेय ग्रंथालयात उत्त्कृष्ट ग्रंथसंग्रह असावा. विदयार्थ्यांना वाचनाची

गोडी लावणारा ग्रंथपाल हवा. शालेय ग्रंथालय निधीमध्ये विदयार्थ्यांकडून घेतले जाणारे ग्रंथालय शुल्क . व्यवस्थापना कडून मिळणारी रक्कम. राज्यशासन किंवा स्थानिक स्वराज्यसंस्था यांच्याकडुन मिळणारी अनुदाने वगैरे यांचा समावेश होतो. शासनाने खालील प्रमाणे शालेय ग्रंथपालांना मान्यता दिलेली आहे.

शाळेत ग्रंथालय स्थापनेचा प्रारंभीचा खर्च राज्यशासन करते या बाबतीत डॉ. रंगनाथन यांच्या मार्गदर्शनाखाली बंगलोरच्या 'ऑल इंडिया सेमिनार ऑन स्कुल लायब्ररीज्' च्या शिफारशीचा विचार करावा.

शिफारसी खालील प्रमाणे आहेत.

१. प्रत्येक विदयार्थ्यामागे रूपये ७/- ग्रंथव इतर वाचन साहित्य खरेदीसाठी राखुन ठेवावेत.

२. याच प्रमाणात ग्रंथालय सेवकांवर खर्च करावी.

३. नविन प्रस्थापित ग्रंथालयासाठी इमरत फर्निचर साधन साम्रग्री प्रांरभीचा ग्रंथसंग्रह भारत सरकारने करावा.

या शिफारशी भारतातील विविध राज्यांच्या शिक्षण खात्यांती लक्षात घेउन आवश्यक ती आर्थिक तरतूद केली तर शालेय ग्रंथालयाची भरभराट झाल्याशिवाय राहणार नाही.

## २.महाविद्यालयीन ग्रंथालये ः-

समृध्द ग्रंथसंग्रह नियतकालिक संग्रह ग्रंथालयसेवक ग्रंथालय इमरत यांची तरतूद नविन महाविदयालयांची उभारणी करता आकरावी लागते. विदयार्थी संख्या शिक्षणकम अभ्यास विषयासाठी (विज्ञान शाखेसाठी प्रयोगशाळा तरतूद) स्वतंत्र अभ्यासिकेची सुविधा या सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो.

महाविदयालयाच्या अर्थसंकल्पात ग्रंथालयासाठी तरतूद केलेली असते.विदयापिठ अनुदान मंडळाची अनुदाने ग्रंथ इमरत अनुदान ग्रंथपेढया या सारखी विशेष अनुदाने मिळतात. विदयार्थ्या कडुन ग्रंथालय शुल्क, अनामत रक्कम, विंलब शुल्क ,ओळखपत्र शुल्क, गहाळ ग्रंथ नुकसान भरपाई या रूपाने शुल्क जमा होते.ते संस्थेच्या निधित जमा होते.

**३.विदयापीठ ग्रंथालये -**विदयापीठाच्या अर्थसंकल्पात ग्रंथालयासाठी ठराविक रक्कम दर वर्षी ठेवली जाते. यातून गंथ खरेदी नियतकालिकांची वर्गणी सेवकांचे पगार भत्ते वगैरे लेखासामग्री गंथ बांधणी व इतर कामासाठी तरतुद केली जाते.विदयापीठ अनुदान मंडळाचे व इतर अनुदाने मिळत असतात.राज्यसरकारकडून विदयापिठ सेवकांचा पगार दिला जातो.दर पंचवार्षिक योजनेत विदयापीठांना विदयापीठ अनुदान मंडळाकडून ग्रंथालयासाठी अनुदान मिळते.यामधील १५%रक्कम हंगामी सेवक व फर्निचरसाठी वापरता येते.हे अनुदान आवर्ती(Recurring Grants)होय.या खेरीज भांडवली खर्चासाठी (NonRecurring)अनावर्ती अनुदान दिले जाते. इमारत बांधणी साधन सामग्री,संगणक

झेरॉक्स यंत्र व इतर उपकरणे यासाठी हे अनुदान दिले जाते. तज्ञाच्या समितीच्या शिफारशीनुसार नैमितिक अनुदाने विषेश साहायता अनुदाने दिली जातात. उदा. ग्रंथपेढी. अशा प्रकारच्या अनुदानातून भारतातील विदयापीठे अनेक महाविदयालये यांनी ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारती बांधल्या आहेत.

ग्रंथालय शुल्क वाचकाकडून घेतले जाते. तसेच संशोधक वनैमितिक वाचकाकडून देखील शुल्क घेतले जात असले तरी त्यातून फारच कमी उत्पन्न मिळते. या खेरीज विलंब शुल्क ग्रंथ गहाळ होणे. ग्रंथ खराब करणे याबददल नुकसान भरपाई या उत्पन्नाच्या बाबी आहेत. रद्दी विकी, झेरॉक्स सेवा शुल्क, ग्रंथालय प्रकाशनाची विकी यातून उत्पन्न मिळते.

या खेरीज विलंब शुल्क ग्रंथ गहाळ होणे, ग्रंथ खराब होणे या बददल नुकसान भरपाई या उत्पन्नाच्या बाबी आसल्या तरी खर्चाच्या तुलनेत फारच कमी उत्पन्न मिळते. शिवाय हे उत्पन्न पितृसंस्थेत जमा केले जाते.

४. **विशेष ग्रंथालये** ः विशेष ग्रंथालयांच्या बाबतीत त्यांच्या पितृसंस्थेच्या अर्थसंकल्पात त्यांच्या खर्चाची तरतूद केली जाते. वाचनसाहित्य, नियतकालिके,सेवकवर्ग वेतन या सर्वा ंसाठी तरतूद केली. एन. सी. एल. चे नवीन संशोधन प्रकल्प किंवा उपक्रम यासाठी विशेष जादा रक्कम राखून ठेवली जाते. याशिवाय ग्रंथालयाकडून दिल्या जाणा-या विशेष सेवांचे शुल्क आकारले जाते. वाचक, संशोधक, इतर संस्था यांच्याकडून असे शुल्क घेतले जाते. अहमदाबाद येथील 'अटिरा' ही संस्था झेरॉक्स - सेवा, लेखसूची - सेवा, आंतरराष्ट्रीय डेटाबेसमधील साहित्यशोध यासाठी सेवाशुल्क घेत असते.

५. **सार्वजनिक ग्रंथालये** ःसार्वजनिक ग्रंथालयांच्या उत्पन्नाच्या व जमेच्या बाजूचा प्रथम विचार करू.

**१ . वर्गणी ः**

सार्वजनिक ग्रंथालयाचे वाचक -आजीव सभासद, प्रथमवर्ग / व्दितीय वर्ग सभासद यांच्याकडून अनामत रक्कम व वार्षिक वर्गणी जमा होत असते . सार्वजनिक ग्रंथालय सेवा तत्वतः निशुल्क असावयास हवी . पण आपल्याकडे ते शक्य होत नाही . सार्वजनिकग्रंथालयातून काही ना काही वर्गणी घेतली जाते .

२ . **ग्रंथालय कर** ः

कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश या राज्यांत सार्वजनिक ग्रंथालय कराची तरतूद आहे . महाराष्ट्र व पश्चिम बंगाल सार्वजनिक ग्रंथालय कायदयात ग्रंथालय कर बसविलेला नाही .

**पहिला ग्रंथालय कायदा -**

तामिळनाड सार्वजनिक ग्रंथालय कायदा १९४८ मध्ये मंजूर झाला . जिंदगी मिळकत करावर प्रत्येक रूपयामागे ६पैसे असा ग्रंथालय कराचा दर आहे .

१ . **शासकीय अनुदाने** ः

राज्यशासन कर्नाटक, तामिळनाडू व आंध्रप्रदेश यांना ग्रंथालय कर वसुलीच्या प्रमाणात समान अनुदान देत असते . महाराष्ट्र शासन सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदाने देत असते . पण ते अनुदान अपुरे पडते . 'राजा राममोहन रॉय ग्रंथालय फौंडेशन' द्वारा विविध राज्यांतील सार्व जनिक अनुदान दिले जाते . रॉय ग्रंथालय फौंडेशने दिलेल्या अनुदाना इतकेच राज्यशासन अनुदान देते . क्रेंद्रसरकारने नवीन ग्रंथालय स्थापनेच्यावेळी खर्च करावा, सार्वजनिक ग्रंथालयासाठी जादा निधी उभा करावा म्हणून नगरपालिका, महानगरपालिका यांनी प्रोत्साहन व परवानगी द्यावी अशी अपेक्षा आहे .

**देणग्या ः**

समाजातील दानशूर व्यक्ती,उदयोजक, सार्वजनिक विश्वस्त निधी, सभासद, नागरिक यांच्याकडून देणग्या जमा करणे हा देखील एक उत्पन्नाचा मार्ग आहे. ग्रंथरूपाने देखील देणग्या मिळविताा येतील.

**४.विलंबशुल्क किंवा दंड ः**

ग्रंथ खराब केल्यास , ग्रंथ गहाळ केल्यास नुकसान भरपाई, वाचनसाहित्य वेळेवर परत न केल्यास विलंबशुल्क घेतले जाते. नियमभंग केल्यास सभासदाकडून दंड घेतला जातो.खर्चाच्या मानाने हे उत्पन्न आगदीच किरकोळ आसते.

**५.संकीर्ण ः**

रद्दीची विक्री,प्रकाशने असल्यास त्यांची विक्री यातून थोडेफार उत्पन्न मिळते (ग्रंथालयाच्या मालकीची इमारत असल्यास) सभागृह काही कार्यक्रमासाठी भाडयाने दिल्यास त्याचे भाडे वगैरे.

आता आपण खर्चाच्या बाबींचा विचार करू.

**खर्चाच्या बाबी ः**

१.वाचनसाहित्य - ग्रंथ, नियतकालिके, वृत्तपत्रे वगैरे

२.ग्रंथदुरूस्ती, ग्रंथबांधणी

३.ग्रंथपाल आणि सहकारीवर्ग वेतन

४ .लेखनसामग्री, मुद्रण वगैरे

५ .इमरत दुरूस्ती

६ .साफसफाई, वीज, पाणी वगैरे

७ . टपालखर्च, दूरध्वनै

८ . सभा -समारंभ, प्रदर्शने वगैरे

या सर्व गोष्टीवरील खर्च आवर्ती स्वरूपाचा असतो .दरवर्षी हा खर्च करावा लागतो .

खर्चाच्या बाबी विभागवार मांडता येतील .

१ . ग्रंथपार्जन विभाग

२ . नियतकालिक विभाग

३ . संदर्भ विभाग

४ . देवघेव विभाग

५ . वाचन विभाग

६ . प्रशासन विभाग

प्रत्येक विभागप्रमुखा कडून त्या त्या विभागाच्या गरजा जाणून घेतल्या जातात . त्यानंतर एकून खर्चाचा अंदाज करून अर्थसंकल्प तयार केला जातो .

## २.८ ग्रंथालयातील अर्थसंकल्प मंजुरीची प्रक्रिया ः [२७]

### १. ग्रंथालय समिती ः

तयार केलेले अर्थसंकल्प प्रथम ग्रंथालय समितीत सादर करावा लागतो. त्यावर नीट विचार व्हावा म्हणून ते आयत्या वेळी सादर करण्याऐवजी पुरेशी पूर्वसूचना देऊन सादर करावे म्हणजे त्याच्या प्रती सभासदांना वेळेवर पोहोचतील (व त्या पोहोचण्यासाठी विश्वासनीय पुरावा आपणाकडे असेल) याची व्यवस्था करावी लागते. समितीमधील विशेष रस घेणारे जे सभासद असतील त्यांपैकी विधायक दृष्टीकोन धारण करणाया सभासदांबरोबर अगोदरच चर्चा करावी. जे टीकाकार असतील त्यांच्याकडून कोणत्या प्रकारची टीका होईल याचे पूर्वा नुभवाने अनुमान काढावे व त्यास बिनतोड स्पष्टीकरण देता येईल असे दस्तऐवज तयार ठेवावे. समितीच्या अध्यभांशी मुददाम संपर्क साधून त्यांना आपणाऊन दिली तरच चर्चेच्या संधीचा पुरेपुर उपयोग करावा. अट्टहासाने आपण अशी चर्चा त्यांच्यावर लादू नये. प्रत्यक्ष सभेमध्ये अध्यक्षांनाच त्याबद्दल बोलण्यास वाव द्यावा. म्हणजे एक प्रकारे तो त्यांचाच प्रस्ताव आहे.

### २. वित्तसमिती ः

ग्रंथालय समितीनंतर मातृसंस्थेच्या वित्तसमितीकडे हे अर्थसंकल्प जाते. त्यापूर्वी ग्रंथालय समितीने काही सूचना व सुधारणा केल्या असल्यास त्यांचा अर्थसंकल्प समावेश करावा. वित्तसमितीच्या अंतिम बैठकीत जाण्यापूर्वी मातृसंस्थेच्या वित्तविभागातील एखादा अधिकारी (छाननी अधिकारी) करतो अथवा वित्तसमितीची एखादी उपसमिती ( अर्थसंकल्प छाननी

---

२७. सातारकर, सु. प्र. "ग्रंथालय व्यवस्थापन तंत्र व मंत्र ", औरंगाबाद १९९५ पृ. १०८-११३.

समिती) करते. या उपस्कारात प्रामुख्याने ग्रंथालयाचे अर्थसंकल्प हे मातृसंस्थेच्या इतर सर्व विभागांच्या अर्थसंकल्पाशी तुलना करून त्याची पुर्नतपासनी केली जाते.तसेच मातृसंस्थेच्या अर्थसंकल्पाच्या तुलनेतही ते तपासले जाते.व काही व्यावहारिक फेरफार सुचविले जातात. अर्थात या तपासणीत ग्रंथपालाला विश्वासात घेतले जातेच तेथेच ग्रंथपालाची खरी कसोटी असते. कारण या पातळीवर अर्थसंकल्पावर काही अशास्त्रीय उपस्कार होतात. उदा. मातृसंस्थेचे धोरण असते.की आस्थापना खर्चात १0 व १५ टक्के कपात करावी.किंवा राष्ट्रीय समस्येमुळे विशिष्ट यंत्रसामुग्री एक वर्ष घेतली जाणार नाही इत्यादी मग ही बंधने कठोरपणे इतर कोणत्याही परिणामांकडे न पाहाता धडाधड लावली जातात त्या वेळी ग्रंथपालाने कसोशीने प्रयत्न करून आपली पडझड जेवढी वाचाता येईल तेवढी वाचवली पाहिजे .याशिवाय इतर कारणांनीही प्रत्येक घटकाची तपासणी केली जाते ग्रंथपालाने पूर्ण तयारीनिशी याचा मुकाबला करणे आवश्यक आहे. कारण येथे झालेल्या संस्करणानंतर पुढे वित्त समितीच्या अंतिम बैठकीत व पुढे वित्त समितीच्या अंतिम बैठकीत व पुढे व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत किंवा सर्वसाधारण सभेत यावर काही बदल होत नाही म्हणून अर्थसंकल्प छाननी समिती वा ते काम करण्याय्रा अधिकाय्रासमोर घेणाय्रा छाननीप्रमाणे ग्रंथपालाची कसोटी लागते.

आशा वेळी छननी कमी करण्यासाठी ग्रंथपालास फक्त दोन गोष्टींचा फायदा होतो.

१.ग्रंथालयाने आजवर केलेला पैशाचा योग्य उपयोग आणि

२.ग्रंथालयाची सर्वांगीण सेवा

ग्रंथालयाबददल सर्वाचेच चांगले मत असेल तर ग्रंथापालाच्या अर्थसंकल्पास कोणी धक्का लावू शकत नाही.उलट अधिक मदतही केली जाते हे चांगले मत चांगल्या दिल्या जात

असलेल्या सेवांतून निर्माण झालेले असते. ग्रंथालयाचे व्यवस्थापन कार्यक्षम असेल तर दिलेला पैसा ग्रंथालयात उपयोगात आणला जाईल. असा विश्वास असेल तर अर्थसंकल्पात सढळ राहण्याची वृत्ती दिसून येते. आणखी एक गोष्ट ही कामी येते. सर्वसाधारण ग्रंथालय हा सर्वा चाच मर्माचा विषय असतो. त्यामुळे मुळातच ग्रंथालयाकडे सहानभूतीने पाहण्याची वृत्ती आढळते. पण कुठे कुठे असाही अनुभव येतो. विशेषता नोकरशाहीचा जेथे वरचष्मा आहे तेथे कटाक्षाने ग्रंथालयावर कुह्मड प्रथम चालवली जाते. या वृत्तीचा कुशलतने उपयोग करून घेणे ग्रंथपालावरच अवलबूंन असते.

अशा प्रकारे अर्थसंकल्प वित्तसमिती समोर जाते .छननीच्या काळात बरीच पडझड झाली असल्यास व तेथे ती ग्रंथपालास थांबवणे शक्य झाले नसल्यास वित्तसमितीची बैठक होण्यापूर्वी तो अपली कैफियत उच्च अधिकाऱ्या समोर मांडू शकातो. मात्र तेथे त्यास आपली बाजू फारच हिरारीने व आग्रहाने मांडावी लागते.

**व्यवस्थापन समिती** ः

वित्त समिती नंतर (मातृसंस्थेची संरचना असेल त्यानुसार) अर्थसंकल्प व्यवस्थापन समितीकडे जाते व तेथून सर्व साधारण सभेसमोर जाते. सर्व साधारण सभेसभेत ज्या सभासदांना ग्रंथालयासंबंधात काही तक्रारी या कैफियत आमसभेपुढे मांडायाची असेल तर ठरावीक मुदतीत अर्थसंकल्पात एक रूपयाची कपात सूचना देवून ग्रंथालयाबावत चर्चा उपस्थीत करण्याचा हक्क सभासद बजावतात. त्यावेळी एक रूपया अथवा कपात सूचना अध्यक्षांनी स्वीकारली पाहिजे. ती काही परिस्थितीत न स्वीकारण्याचा अधिकार अध्यक्षाना आसतो. पण नियमानुसार गेली असेल तर ती स्वीकारली जाते. सामान्यापणे ग्रंथालयाबद्दलचे सर्वसाधारण जनमत जाणून घेण्यासाठी ही एक संधी आहे. असे काही अध्यक्ष

मानतात.अशा वेळी टीका वा भाष्याचा रोख कशावर असेल याचा काहीच अंदाज येत नसल्यामुळे ग्रंथपालास सतर्क राहावे लागते.बरेचदा अशा वेळी या संदर्भात अध्यक्षच काही माहिती ग्रंथपालाकडून मागवून घेतात.कारण सर्वसाधारणपणे टीकेला उत्तर अध्यक्षांना घ्यावयाचे असते.ग्रंथपालाने नव्हे सभा सुरू झाल्यावर कपात सुचनेवर भाषण चालू असतानाच संबधीत दप्तर मागवून घेऊन अध्यक्षांना दाखवावे लागते व त्याच्या साहाय्याने अध्यक्ष उत्तर देतात.ग्रंथपाल सर्वसाधारण सभेचा सभासद असेल तर अध्यक्ष त्याला झालेल्या भाषणावर व त्यात उपस्थित झालेल्या विशेष मुदयांवर उत्तरवजा टिप्पणी करण्यास सांगतात व मग अध्यक्ष बोलतात. अशा भाषणातून काही महत्वाच्या सूचना आल्यास व अध्यक्षांनी त्या स्वीकारल्यास त्यांचे पालन करणे ग्रंथालयावर बंधनकारक असते व त्यांचे पालन केले गेले आहे याचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी अध्यक्षांना दयवा लागतो. ग्रंथपाल आमसभेचा सभासद असेल तर ग्रंथपालाऐवजी उत्तर देण्याची वा टिप्पणी करण्याची जबाबदारी त्याच्यावर येते. या भाषणे व त्यावरील चर्चेत काही गंभीर मुद्दे उपस्थित झाल्यास त्याबाबत अध्यक्षांनी काही निर्णय दिल्यास तत्संबंधीची कारवाई ग्रंथपालास करावी लागून अध्यक्षांना कार्यपूर्तीचा अहवाल दयावा लागतो अशा प्रकारे अर्थसंकल्पात मान्यता मिळते. बरेचदा या सर्व प्रक्रीयेतून जाताना काही भाग आवश्यक असला तर कोणत्या कारणाने मान्य करता येत नाही. तो पूरक अर्थसंकल्पात विचारात घेतला जाईल असे आश्वासन दिले जाते सामान्यपणे अचानक उद्‌भवलेल्या बाबींमुळे किंवा जमेच्या अपेक्षित बाजू अर्थसंकल्पाच्या वेळी पूर्ण होवून थकल्यामुळे (व त्या वर्षाच्या सुरवातीसच पुय्रा होवून जमेची बाजू भक्कम होण्याच्या शक्यतेमुळे) पुरक अर्थसंकल्प अर्थिक वर्षाच्या मध्यात सादर केला जाण्याची पद्धत आहे अशा वेळी त्यात ग्रंथालयाच्यासंबधी एखाद दुसरी बाब असल्यास मुख्य अर्थ संकल्पाच्या वेळेचीच सर्व प्रकिया पुन्हा करावी लागते अगदी अवश्यक असेल तर ती जरुर

करावी. मात्र असा संकेत आहे की पूरक अर्थसंकल्पात जाणे हे अकार्यक्षमतेचे लक्षण आहे. शिवाय त्यात बराच कार्यालयीन वेळ खर्च होतो. म्हणून पुरक अर्थसंकल्पाच्या प्रक्रियेत ग्रंथपाल जाण्याचे शक्यतो टाळतात.

सामान्यपणे सर्व ठिकाणी आर्थिक वर्ष एक एप्रिल ते एकतीस मार्च अशा कालावधीत असते. त्यामुळे अर्थसंकल्पास मान्यता एक एप्रिलपूर्वी मिळणे आवश्यक असते. वर उल्लेखलेली सर्व कार्यवाही पूर्ण करण्यासाठी पुढील वर्षाच्या अर्थसंकल्पाच्या कामास सप्टेंबरमध्ये सुरुवात करावी लागते व पुरक अर्थसंकल्पाची सुरुवात मे महिन्यात करावी लागते (अर्थात पुरक अर्थसंकल्पात ग्रंथालयाचा भाग असल्यास)

सर्व प्रक्रियेमध्ये ग्रंथालय समितीस सादर केलेल्या मुळ अर्थसंकल्पात काही बदल झाला असल्यास तो बदल अर्थसंकल्प प्रक्रिया पूर्ण झाल्यावर ग्रंथालय समितीच्या सभासदांस वेळीच कळवावे लागते.

## २.९ अर्थसंकल्पाची मांडणी ः- [२८]

ग्रंथालयाच्या विविध विभागात चालणा-या कामकाजासाठी अर्थसंकल्प विस्तृत तर्कसंमत आर्थिक अंदाज सादर करीत असते. अर्थसंकल्प तयार करताना आपल्या भविष्यकालीन गरजांचा विचार करावयास हवा. ग्रंथालयातील विविध विभागाच्या प्रमुखांना त्यांच्या खर्चाचा तपशील लेखी स्वरूपात द्यावयास सागावा वित्तीय वर्षाचे पूर्वी २ ते ४माहिने अगोदर अर्थ संकल्प तयार करणे रास्त होय. विभाग प्रमुखांशी चर्चा करून कोणत्या बाबींना प्राधान्य दयावयाचे ते ठरवावे. ग्रंथापालाने ग्रंथसमितीच्या अध्यक्षा बरोबर चर्चा करावी. मागील

२८. भागवत,श.ग. ''ग्रंथालय व्यवस्थापन'' युनिव्हर्सलप्रकाशन,पुणे २००७पृ.६२-७४

वर्षाचा अनुभव चालू खर्च व पुढील वर्षाचा अनुभव,चालू खर्च व पुढील वर्षाच्या संकल्पित खर्चाचा विचार अर्थसंकल्प तयार करताना करावा. खाली दिलेल्या तपशीलानुसार अर्थ संकल्प तयार करून ग्रंथालय समितीला सादर करावा व समितीची मंजुरी घ्यावी.एकूण खर्चा च्या ५0% रक्कम ग्रंथालयीन सेवकवर्गावर (त्यांच्या वेतनावर)खर्च करावी असे डॉ. रंगनाथन यांनी सुचविले आहे.१९५७ च्या भारत सरकारच्या सल्लागार समितीने खालील प्रमाणे खर्चाची विभागणी असावी असे सुचविले आहे.

| | |
|---|---|
| १. ग्रंथालयीन सहकारीवर्गाचे वेतन | ५0 % |
| २. वाचनसाहित्य | २0% |
| ३. नियतकालिके आणि वृत्तपत्रे | ५% |
| ४. ग्रंथाची निगा, देखभाल वगैरे | २% |
| ५. विमा, इमारत, भाडे वगैरे | ५% |
| ६. लेखनसामग्री, छपाई, उपकरणे वगैरे | १३% |

अर्थसंकल्प तयार करताना पुढील काही बाबींचा आवर्जुन विचार करावयास हवा. वाचन साहित्याच्या वाढत्या किंमतीमुळे अर्थसंकल्पात फेरफार करावा लागेल.वेतन, भत्ते यामधील वाढ , नियतकालिकांच्या वर्गणीत वाढ विशेष ग्रंथालयात नियतकालिकांवर अधिक खर्च करावा लागतो.कारण त्यातून मिळणारी अद्ययावत माहिती ही त्या ग्रंथालयाची गरज असते. अर्थसंकल्पात यासाठी वाठीव रक्कमेची तरतूद करावी लागते.

त्यासाठी खालीलप्रमाणे तीन वर्षाची मांडणी करावी.

| बाब | मागील वर्षातील प्रत्यक्ष खर्च | चालू वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूद | चालू वर्षातील सुधारित अंदाज | पुढील वर्षासाठी आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**अर्थसंकल्प नमुनाः**

| खात्याचे नाव | प्रत्यक्ष जमा २००१.०२ | अर्थसंकल्प २००२.०३ | अर्थ संकल्प २००३ .०४ | खात्याचे नांव | प्रत्यक्ष जमा | अर्थसंकल्प २००२.०३ | अर्थ संकल्प २००३ .०४ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्गणी | | | | ग्रंथ | | | |
| प्रवेशशुल्क | | | | नियतकालिके | | | |
| सरकारी अनुदान | | | | ग्रंथबांधणी | | | |
| नगरपालिका | | | | वीज, पाणी | | | |
| अनुदान | | | | लेखनसामग्री | | | |
| रोख देणगी | | | | टपालखर्च | | | |
| रद्दी विक्री | | | | छपाई | | | |
| विलंबशुल्क | | | | दूरध्वनी | | | |
| दंड वगैरे | | | | साफसफाई | | | |
| गहाळ ग्रंथ | | | | सहकारी वेतन | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| नुकसान | | | | सांस्कृतिक कार्यक्रम | | | |
| भरपाई | | | | ग्रंथालय संघ | | | |
| आजीव सभासद | | | | वर्गणी | | | |
| वर्गणी | | | | वाचनसाहित्य निगेसाठी | | | |
| अनामत रक्कम | | | | जंतुनाशक औषधे संकीर्ण | | | |
| एकूण | | | सहकार्य वाह | कार्यवाह | | कार्यध्यक्ष | |

## २.१० अर्थसंकल्पाचे नियंत्रण ः [२९]

अर्थसंकल्प हे नियंत्रणाचे महत्वाचे तंत्र आहे. अर्थसंकल्पाची कार्यक्षमपणे व काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यांकरिता सर्व क्रिया अर्थसंकल्पानुसार होत आहेत किंवा नाहीत हे वेळोवेळी तपासून पाहणे आवश्यक ठरते.अर्थसंकल्प व्यक्त केलेले अंदाज व प्रत्याक्षात दिसून येणारे वास्तविक परिणाम यांची तुलना करण्याच्या क्रियेला अर्थसंकल्पीय नियंत्रण असे म्हणतात. या क्रियेला मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

१. अर्थसंकल्पात व्यक्त केलेला अंदाज व प्रत्यक्ष परिणाम यातील अंतर शोधणे.

२९.गणपुले,श.रा., "ग्रंथालयीन साधनसामग्री आणि सेवा यांचे व्यवस्थापन", नाशिक, २०००, पृ.क्र. २४-२५

२ .अंतर असल्यास ते उदभविण्याचे कारण शोधणे .

३ .कारण दूर करण्याकरितاा योग्य ती उपाययोजना राबविणे .

**२ .११ अर्थसंकल्प नियंत्रणाचे फायदे** ः

१ . अर्थसंकल्पातील नियंत्रणामुळे नियोजनातील उद्दिष्टे साध्य होतात .

२ .ग्रंथालयीन सेवा व उत्पादनाकरितاा आखलेल्या योजनेच्या अंमलबजावणी करिता पुरेशा भांडवलाची उपलब्धता करून देता येते .

३ . अर्थसंकल्पातच्या नियंत्रणाद्वारे खर्च व उत्पन्न या माहितीद्वारे खर्चावर नियंत्रण घालता येते .

४ .ग्रंथालयाच्या क्षमतेमध्ये वाढ करण्यासाठी हे तंत्र उपयुक्त ठरते .

५ .उप्लब्ध साधनांचा पुरेपुर उपयोग या नियंत्रण पध्दतीमुळे शक्य होते .

**२ .१२ अर्थसंकल्प नियंत्रणाचे तोटे** ः

१ . अर्थसंकल्पाचे नियंत्रण ही कौशल्यपूर्ण व क्लिष्ट बाब आहे .

२ .अनपेक्षित होणारे बदल दुर्लक्षिले जातात .

३ .नियंत्रणाचे स्वरूप तांत्रिक बनवण्याची शक्यता असते .

४ .ग्रंथालयातील व्यवस्थापन व नियंत्रण मुळातच कमजोर असेल तर अर्थसंकल्प नियंत्रणाचा अपेक्षित फायदा मिळत नाही .

**२.१३ सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत व्यवस्थापन महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अर्थसंकल्प ः-** सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत व्यवस्थापन महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अर्थसंकल्प हा महाविद्यालयीन ग्रंथालय अर्थसंकल्पात येत असुन सिंहगडमधील सर्व ग्रंथालयाचे अर्थसंकल्प हे self funded आहे.

**संदर्भसुचीः-**


१.सातारकर,सु.प्र."ग्रंथालय व्यवस्थापन तंत्र व मंत्र ",औरंगाबाद १९९५पृ.१०८-११३.

२.सुतार,धनंजय."ग्रंथालय आणि माहितीशास्त्र"सांगली२०११,पृ.२००६-२००८.

३.क-हाडे,बी.एम."शास्त्रीय संशोधन पद्धती" पिंपळापुरेॲण्ड कं.पब्लिशर्स,नागपूर पृ.१-१२

४.भागवत,श.ग."ग्रंथालय व्यवस्थापन"युनिव्हर्सलप्रकाशन,पुणे २००७पृ.६२-७४

५.महाजन,शां.ग."ग्रंथालय व्यवस्थापन" पुणे विद्यार्थीगृह प्रकाशन,पुणे २००७ पृ.३८-४१

६.Mishra,k,c. "२१ century library management" p.63

७.गणपुले,श.रा., "ग्रंथालयीन साधनसामग्री आणि सेवा यांचे व्यवस्थापन", नाशिक, २०००, पृ.क्र. २४-२५

8.http://www.jgateplus.com

9.http://www.scoslibrary.webs.com

10.http://www.library.ualberta.calaboutus/budget/index.cfm

# प्रकरण ३रे

## ३ .१ सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीचा इतिहास ः- [३०]

पुणे शहर हे विद्येचे माहेरघर आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा वारसा लाभलेल्या पुणे शहरात अनेक नामवंत लोकांनी आपल्या कर्तृत्वाने प्राथमिक , माध्यमिक, उच्च माध्यमिक , व्यावसायिक शिक्षण संस्था व संशोधन विद्यापीठांची स्थापना केली आहे. परंतु या सर्वांमध्ये सिंहगडटेक्निकल एज्युकेशन सोसायटीची स्थापना या संस्थेचे संस्थापक प्रा. एम.एन. नवले सर यांनी १२ ऑगस्ट १९९३ मध्ये केली. हि संस्था पुणे विद्यापीठ अंतर्गत आहे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापुर्ण शिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास घडवने हा एकमेव उद्देश समोर ठेऊन अनेक शिक्षणक्रम सुरू केले आहेत. स्थापानेपासून ते आजपर्यंत या संस्थेने प्रत्येक पाऊल प्रगतिच्या दिशेने टाकाले आहे.

**“तमसो मा ज्योतिर्गमय”**

अंधारातून उजेडाकडे असे ब्रीदवाक्य असलेल्या या संस्थेच्या विकासाचे मूल्यमापन करणे अतिशय कठीण काम आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत अत्यंत कमी कालावधीत संस्थापक श्री.एम. एन. नवले सर यांनी हे यशाचे शिखर गाठण्यासाठी केलेले परिश्रम व शिक्षणाचा विकास करण्यासाठी चालविलेले प्रयत्न अवर्णनीय आहेत. १00 हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र व्यापलेल्या या संस्थेमध्ये ३0,000 पेक्षा जास्त विद्यार्थी तज्ञ आणि प्रशिक्षित प्राध्यापकवर्गाच्या मार्गदर्शनाखाली विविध शिक्षणक्रम पूर्ण करत आहेत.

या संस्थेची अनेक टेक्निकल कॉलेजेस, व्यावसायिक कॉलेजेस, मेडिकल कॉलेज, फार्मसी, मेडीकल, डेंटल, नर्सिंग, कॉम्प्युटर, लॉ, कला, वाणिज्य व विज्ञान रेसीडेन्सी, पब्लीक स्कूल आणि इंग्लिश मिडीयम स्कूल हे पुणे जिल्हया मध्ये विखुरलेली आहेत. या कॉलेज व

शाळांमध्ये अत्याधुनिक सोयी पुरविल्या जातात.यातून संशोधकाने पुण्यातील व्यवस्थापकीय महाविदयालयाच्या ग्रंथालयाचा अभ्यास केला आहे.सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या अतंर्गत खालील कॅम्पसचा समावेश होतो.

## Vadgaon(bk)

1. Sinhgad Institue of Management
2. Sinhgad College of Engineering
3. Smt. Kashibai Navale College of Engineering
4. Sinhgad College of Architecture
5. Sinhgad Institute of Interior Design & Decoration
6. Sinhgad College of Pharmacy
7. Sinhgad College of Pharmacy (Ploytechinc)
8. Sinhgad Spring Dale Residential Public school.
9. Sinhgad Dental College and Hospital

## Ambegoan (Bk)

1. Sinhgad Spring Dale Publis school (Day school,CBSE)
2. Sinhgad College of Education Training & Research (B.ed.)
3. Sinhgad College of Education Training & Research  (women)
4. Sinhgad College of education training & research (D. Ed)
5. Sinhgad Law College.
6. Sinhgad Business School
7. NBN Sinhgad School of Engineering
8. NBN Sinhgad School of Management Studies
9. Sou. Venutai Chavan Polytechnic

10.NBN Sinhgad School of Computer Studies.

11.Smt.Kashibai Navale Sinhgad School of Business Management.

12.Sinhgad Business School

13.Sou. Kashibai Navale Sinhgad School of Business Management.

14.Sinhgad College of Science.

15.Sinhgad Junior College of Arts, Science & Commerce

## Narhe Ambegaon Campus .

1. Sinhgad Spring Dale Nursery School
2. Sinhgad Spring Dale Primary School
3. Sinhgad Spring Dale secondary School
4. Sinhgad College of Arts & Commerce
5. Sinhgad Institute of Management & Computer Application
6. Sinhgad School of Business Studies.
7. Smt. KantabaiPansare Junior College of Education (D. Ed)
8. Singad Institute of Pharmacy
9. Smt. Kashibai Navale General Hospital & Research Center
10. Sinhgad College of Education.
11. Sinhgad College of Education (B. Ed. Women)
12. Sinhgad College of Arts, Science & Commerce (Jr. College)
13. Sinhgad College of Nursing.
14. Sinhgad Institue of Techonogy& Science
15. Smt. Kashibai Navale College of Physiotheraphy.

## Kondhwa (Bk)

1. Sinhgad College of Commerce
2. Sinhgad College of Arts, Science & Commerce (Jr. College)
3. Sinhgad City School: Pre- primary Section
4. Sinhgad City School: Primary Section
5. Sinhgad City School: Secondary Section
6. Sinhgad Insitute of Business Administration & Research
7. Sinhgad Business School (SBS, Autonomus)
8. Smt. Kashibai Navale Institute of Education (D.Ed)
9. Smt. Kashibai Navale Institute of Education(B. Ed)
10. Smt. Kashibai Navale College of Pharamcy
11. Sinhgad Academy of Engineering

## Lonavala, kusgoan (bk) campus

1. Sinhgad Institute of Pharmaceutical Sciences (D. Pharm)
2. Sinhgad Institute of Pharmaceutical Sciences (B. Pham)
3. Sinhgad Institute of Hotel Management and Catering Technology
4. Sinhgad Institute of Business Administration and Computer Application.
5. Sinhgad Business School (SBS, Autonomous)
6. Sinhgad Institute of Technology
7. Sinhgad Public School Pre- primary (Resi.& Day schllo)
8. Sinhgad Public School Primary (Resi.& Day school)
9. Sinhgad Public school Secondary (Resi.& Day school)

10. Smt. Kashibai Navale College of Education & Training (D.ed) Smt. Kashibai Navale College of Education & Training
11. Smt. Kashibai Navale College of Education & Training (B.ed) Women
12. Nivruti Babaji Navale College of Commerce

## Karve Road (Erandawane)

1. Sinhgad Business School (Distance Edu. Prog)
2. SIOM-DEC (SinhgadInstitue of Management Distance Education Centre)
3. Sinhgad Spring Dale Pre-Primary School
4. Sinhgad Spring Dale Primary School
5. Sinhgad Spring Dale Secondary School
6. Smt.KashibaiNavale College of Commerce
7. SinhgadInstitute of Aviation and Hospitality Management.

## Warje campus

1. RMD Sinhgad College of Engineering
2. RMD Sinhgad School of Management Studies.
3. Pawan Gandhi Sinhgad Spring Dale School

## Kondhapuri campus

1. Sinhgad management school
2. Sant.Dnyaneshwar Shikshanshastra Mahavidyalaya (B.ed.)
3. Vidyaniketan Madhyamik & UcchaMadhayamik Commerce & Science College.
4. Vidyaniketan Prashala.

## Mumbai campus

1.Sinhgad Institute of Business Management.

2.Sinhgad College of Commerce.

## Sangola (Kamlapur) campus

1.Sinhgad Public School

2.Sinhgad Institue of Computer Application (MCA)

3.Sinhgad Institue Business Management (MBA)

4.Smt. Kashibai Navale College of Education ( B. Ed/ D. Ed)

5.Anand Vidyalaya (Highschool, Marathi medium)

## Pandharpur campus

1.Sinhgad Public School.

2.SKN Sinhgad College of Engineering

3.SKN Sinhgad Business School

4.Sinhgad Institute of Computer Sciences.

## Solapur campus

1.NBN Sinhgad College of Engineering.

2.NBN Sinhgad Business School.

3.Sinhgad School of Computer Studies.

**३.२ संशोधकानी अभ्यासलेली महाविदयालयाची माहीती खालीलप्रमाणे आहेः-**

संशोधकाने संशोधनासाठी सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी मधील पुणे विद्यापीठ अंतर्गत येणाय्रा व्यवस्थापन महाविद्यालयातील ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा विषय आहे.

१.सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीमधील सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट हे सर्वात पहिले व्यवस्थापन महाविद्यालय आहे.या महाविद्यालयास सीऑम (SIOM) या नावानेही ओळखले जाते.या महाविद्यालयाची स्थापना सन १९९४ला झाली आहे.हे महाविद्यालय सर्वे . नबंर ४४/१,वडगांव (बुद्रुक),सिंहगड रोड,पुणे-४११0४१ येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.गोखले आहेत.या महाविद्यालयाची सन. १९९४ साली विद्यार्थी संख्याही फक्त साठ होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.१४हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकलप हा वार्षिक आहे.सन.१९९४ साली या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प १ लाख होता.ग्रंथ संख्या ही बाराशे असून छापील नियतकालिके राष्ट्रीय १0व आंतरराष्ट्रीय २ होती.सन.१९९४ला ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही दोन असून ग्रंथालय बारा तास सेवा देत असे.

सन.२0१२ला सहाशे विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.१ लाख ५२हजार आहे.सन.२0१२-२0१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.२६लाख आहे.ग्रंथालयातील एकूण शिर्षके ही ४ हजार ७५२असून एकूण ग्रंथ संख्या ही ३६ हजार ७७0 आहे. छापील नियतकालिके राष्ट्रीय १२२ व आंतरराष्ट्रीय ३१ आहेत.तर ऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMIT,BCRC,व PROQUEST ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री.संदिपान

ताद्गे असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही ११ आहे.या ग्रंथालयातून २४ तास सेवा पुरवली जाते.

२.संशोधकाने अभ्यासलेले दुसरे व्यवस्थापन महाविद्यालयएस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंटहे आहे. या महाविद्यालयास एस.के.एन.(SKN) या नावानेही ओळखले जाते.या महाविद्यालयाची स्थापना सन.२०१० झाली आहे.हे महाविद्यालय सर्वे.नबंर १०/१,आंबेगाव,तालुका-हावेली,सिंहगड रोड,पुणे-४११०४१ येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.राजश्री शिंदे या आहेत.या महाविद्यालयाची सन.२०१०ला विद्यार्थी संख्याही १२० होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.६०हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकलप हा वार्षिक आहे.सन.२०१० ला या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प १० लाख होता.ग्रंथ संख्या ही १,५०० असून छापील नियतकालिके राष्ट्रीय २५ व आंतरराष्ट्रीय २५ होती.सन.२०१० ला ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही दोन असून ग्रंथालय बारा तास सेवा देत असे.

सन.२०१२ सली ३२० विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.९०हजार आहे.सन.२०१२-२०१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.१४लाख आहे.ग्रंथालयातील एकुण शिर्षके ही ९१५असून एकुण ग्रंथ संख्या ही ५ हजार १७० आहे. छापील नियतकालिके राष्ट्रीय ६०व अंतरराष्ट्रीय ५आहेत.तरऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMITव BCRC, ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री.राहुल विसवे असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही ०२आहे.या ग्रंथालयातून २४ तास सेवा पुरवली जाते.

३.संशोधकाने अभ्यासलेले तिसरे व्यवस्थापन महाविद्यालय सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन हे आहे. या महाविद्यालयास सीमका (SIMCA) या

नावानेही ओळखले जाते.या महाविद्यालयाची स्थापना सन.२००४ झाली आहे.हे महाविद्यालय ४९/१,पुणे-मुबंई बायपास नऱ्हे-आंबेगाव पुणे-४११०४१ येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.मिंलिद मराठे हे आहेत.या महाविद्यालयाची सन.२००४ ला विद्यार्थी संख्याही ६० होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.६५हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकलप हा वार्षिक आहे.सन.२००४ला या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प ६ लाख होता.ग्रंथ संख्या ही १,४०० असून छापील नियतकालिके राष्ट्रीय २५ व आंतरराष्ट्रीय२५ होती.सन.२०१०ला ग्रंथालयीन

कर्मचारी संख्या ही दोन असून ग्रंथालय आठ तास सेवा देत असे.

सन.२०१२ला१८० विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.१लाख२०हजार आहे.सन.२०१२-२०१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हारु.१०लाख आहे.ग्रंथालयातील एकुण शिर्षके ही ४००असून एकुण ग्रंथ संख्या ही २५ हजार ७७८ आहे. छापील नियतकालिके राष्ट्रीय ४१ असून आंतरराष्ट्रीय नियतकालिकांची सेवा दिली जात नाही.तर ऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMIT व BCRC, ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्रीमती छाया कार्ले असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही ५आहे.या ग्रंथालयातून १६ तास सेवा पुरवली जाते.

४.संशोधकाने अभ्यासलेले चौथे व्यवस्थापन महाविद्यालय सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज हे आहे. या महाविद्यालयास एस.एस.बी.एस. (SSBS) या नावानेही ओळखले जाते.या महाविद्यालयाची स्थापना सन.२०१० झाली आहे.हे महाविद्यालय ४९/१,पुणे-मुंबई बायपास नऱ्हे-आंबेगाव पुणे-४११०४१ येथे आहे.या महाविद्यालयाचे

डायरेक्टर डॉ.शैलेंद्र काळे हे आहेत.या महाविद्यालयाची सन.२०१०ला विद्यार्थी संख्याही १२० होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.६०हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा वार्षिक आहे.२०१० साली या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प ८लाख होता.ग्रंथ संख्या ही १,४०० असून छापील नियतकालिके राष्ट्रीय १५ व आंतरराष्ट्रीय ५होती.सन.२०१०ला ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही दोन असून ग्रंथालय आठ तास सेवा देत असे.

सन.२०१२ सली ३०० विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.९६हजार आहे.सन.२०१२-२०१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.२१ लाख आहे.ग्रंथालयातील एकूण शिर्षके ही ९१२असून एकूण ग्रंथ संख्या ही ५ हजार १९२ आहे. छापील नियतकालिके राष्ट्रीय ६०असून अंतरराष्ट्रीय नियतकालिकांची सेवा दिली जात नाही.तर ऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMIT व BCRC, ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्रीमती एस.आपटे असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही २आहे.या ग्रंथालयातून १२ तास सेवा पुरवली जाते.

५.संशोधकाने अभ्यासलेले पाचवे व्यवस्थापन महाविद्यालय सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस अडमिन ॲण्ड रिसर्च हे आहे. या महाविद्यालयास सीबार (SIBAR) या नावानेही ओळखले जाते.या महाविद्यालयाची स्थापना सन.२००४ला झाली आहे.हे महाविद्यालय पी.एम.सी.जवळ ऑक्ट्राय पोस्ट कोढंवा(बुद्रुक),सासवड रोड,पुणे-४११०४८ येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.औधूत पोळ हे आहेत.या महाविद्यालयाची सन.२००४ला विद्यार्थी संख्याही ६० होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.५०हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा वार्षिक आहे.सन.२००४ला या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प ५लाख होता.ग्रंथ संख्या ही २,२०० असून छापील नियतकालिके राष्ट्रीय १५ व आंतरराष्ट्रीय ५होती.सन.२०१०ला ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही दोन असून ग्रंथालय आठ तास सेवा देत असे.

सन.२०१२ सली ३६० विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.१ लाख ४८हजार आहे.२०१२-२०१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.३५लाख४१हजार आहे.ग्रंथालयातील एकुण शिर्षके ही ३१६७असून एकुण ग्रंथ संख्या ही ३६ हजार १९७ आहे. छापील नियतकालिके राष्ट्रीय ८५असून आंतरराष्ट्रीय २२आहेत.तर ऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMIT,BCRC,ASPP व SPSF VERSION18 ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री.बीपीन निरगुडे असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही ७आहे.या ग्रंथालयातून १६ तास सेवा पुरवली जाते.

६.संशोधकाने अभ्यासलेले साहवे व्यवस्थापन महाविद्यालय सिंहगड बिझनेस स्कुल हे आहे. या महाविद्यालयास एस.बी.एस.(SBS) या नावानेही ओळखले जाते.या महाविद्यालयाची स्थापना सन.२००७ला झाली आहे.हे १९/१५,खिलार मार्ग ,कर्वे रोड,एरडंवणे -४११००४येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.अदिती मारकळे या आहेत.या महाविद्यालयाची सन.२००७साली विद्यार्थी संख्याही १२० होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.७५हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा वार्षिक आहे.सन.२००७ साली या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प १०लाख होता.ग्रंथ संख्या ही ३,५०० असून

छापील नियतकालिके राष्ट्रीय २४व आंतरराष्ट्रीय २४होती.सन.२०१0साली ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही दोन असून ग्रंथालय बारा तास सेवा देत असे.

सन.२0१२ ला ३६0 विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.१ लाख ४८हजार आहे.सन.२0१२-२0१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.१३लाख आहे.ग्रंथालयातील एकूण शिर्षके ही १६६९असून एकूण ग्रंथ संख्या ही ७ हजार ८२0आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय छापील नियतकालिकांची सेवा दिली जात नाही. तर ऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMIT व BCRC ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्रीमती रोहिणी माडरेकर असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही पाच आहे.या ग्रंथालयातून १८तास सेवा पुरवली जाते.

७.संशोधकाने अभ्यासलेले सातवे व्यवस्थापन महाविद्यालय एस.टी.ई.एस.सिंहगड बिझनेस स्कुल हे आहे. या महाविद्यालयाची स्थापना सन.२00७ला झाली आहे.हे १९/१५,खिलार मार्ग ,कर्वे रोड,एरडंवणे -४११00४येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.एस.यू.गावडे हे आहेत.या महाविद्यालयाची सन.२00७ विद्यार्थी संख्या ही १२0 होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.७५हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा वार्षिक आहे.सान.२00७ला या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प १0 लाख होता.ग्रंथ संख्या ही ३,५00 असून छापील नियतकालिके राष्ट्रीय २४ व आंतरराष्ट्रीय२४होती.सन.२०१0 ला ग्रंथालयीन कर्म चारी संख्या ही दोन असून ग्रंथालय बारा तास सेवा देत असे.

सन.२0१२ ला ३६0 विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.१ लाख ४८ हजार आहे.२0१२-२0१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.३0लाख आहे.ग्रंथालयातील

एकुण  शिर्षके ही ७२0असून एकूण ग्रंथ संख्या ही ७ हजार ८८0आहे.राष्ट्रीय ४५तर आंतरराष्ट्रीय छापील नियतकालिकांची सेवा दिली जात नाही.ऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMIT व BCRC ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्रीमती रोहिणी माडरेकर असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही ५आहे.या ग्रंथालयातून १८तास सेवा पुरवली जाते.

८.संशोधकाने अभ्यासलेले आठवे व्यवस्थापन महाविद्यालय सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस अडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन हे आहे.या महाविद्यालयास सीबाका (SIBCA) या नावानेही ओळखले जाते. या महाविद्यालयाची स्थापना सन.२00४ला झाली आहे.हे३0९/३१0,कुसगांव,४९/१,पुणे-मुबंई एक्सप्रेस हायवे लोणावळा,पुणे -४१00१येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.पराग कालकर हे आहेत.या महाविद्यालयाची सन.२00४ला विद्यार्थी संख्याही ६0 होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.५२हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा वार्षिक आहे.२00४ साली या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प ४लाख होता.ग्रंथ संख्या ही २३,000 असून छापील नियतकालिके राष्ट्रीय १३ व अंतरराष्ट्रीय ५होती.सन.२0१0ला ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही दोन असून ग्रंथालय आठ तास सेवा देत असे.

सन.२0१२ ला ३६0 विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.१ लाख ४२हजार आहे.सन.२0१२-२0१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.१५लाख आहे.ग्रंथालयातील एकूण  शिर्षके ही ६00असून एकूण ग्रंथ संख्या ही २७ हजार आहे. राष्ट्रीय१३७व अंतरराष्ट्रीय ६६ छापील नियतकालिकांची सेवा दिली जाते. तर ऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMIT,BCRC,DIG व IEEE ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल

श्रीमती गीता दिवार असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही आठ आहे. या ग्रंथालयातून १६तास सेवा पुरवली जाते.

९. संशोधकाने अभ्यासलेले नववे व्यवस्थापन चे महाविद्यालय श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग हे आहे. या महाविद्यालयास एस.के.एन.(SKN) या नावानेही ओळखले जाते.या महाविद्यालयाची स्थापना सन.२000ला झाली असून या महाविद्यालयामध्ये व्यवस्थापन शाखा ही सन.२00८ पासून चालू झाली आहे.हे महाविद्यालय सर्वे नबंर४४/१,वडगांव(बुद्रुक) ,सिंहगड रोड,पुणे-४११0४१ येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.अरविंद देशपाडें हे आहेत.या महाविद्यालयाची सन.२00८ला विद्यार्थी संख्याही ६0 होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.८४हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा वार्षिक आहे.सन.२00८ला या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प १२लाख होता.ग्रंथ संख्या ही १,३५0 असून छापील नियतकालिके राष्ट्रीय १७ व आंतरराष्ट्रीय १३ होती.सन.२00८ला ग्रंथालयीन कर्म चारी संख्या ही आठ असून ग्रंथालय सोळा तास सेवा देत असे.

सन.२0१२ ला ६0 च विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.९६हजार आहे.सन.२0१२-२0१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.२५लाख आहे हा अर्थसंकल्प हा एम.बी.ए.आणि इंजिनिअरींग या दोन्ही शाखांचा मिळून आहे.ग्रंथालयातील एकूण शिर्षके ही ५६५असून एकूण ग्रंथ संख्या ही ३ हजार७९८ आहे.दोन्ही मिळून राष्ट्रीय १५५व अंतरराष्ट्रीय ५ छापील नियतकालिकांची सेवा दिली जाते. तर ऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMIT,BCRC,ASME,SCIENCE DIRECT व IEEE ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल

श्री.चंद्रमोहन तोडूंर असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही आठ आहे.या ग्रंथालयातून २४तास सेवा पुरवली जाते.

१0.संशोधकाने अभ्यासलेले दाहवे व्यवस्थापन महाविद्यालय सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग हे आहे. या महाविद्यालयास एस.सी.ओ.ई.(SCOE) या नावानेही ओळखले जाते.या महाविद्यालयाची स्थापना सन.१९९३ला झाली असून या महाविद्यालयामध्ये व्यवस्थापनाची शाखा ही सन.२00८ पासून चालू झाली आहे.हे महाविद्यालय सर्वे नवंर४४/१,वडगांव(बुद्रुक) ,सिंहगड रोड,पुणे-४११0४१ येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.शशिकांत लोखंडे हे आहेत.या महाविद्यालयाची सन.२00८ला विद्यार्थी संख्याही ६0 होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.८४हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा वार्षिक आहे.सन.२00८ ला या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प ३0लाख होता.ग्रंथ संख्या ही १,६00 असून छापील नियतकालिके राष्ट्रीय २0व आंतरराष्ट्रीय२होती.सन.२00८ला ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही अकरा असून ग्रंथालय सोळा तास सेवा देत असे.

सन.२0१२ ला ६0 च विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.९६हजार आहे.सन.२0१२-२0१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.७0लाख आहे हा अर्थसंकल्प हा व्यवस्थपन आणि इंजिनिअरींग या दोन्ही शाखांचा मिळून आहे.याग्रंथालयातील एकूण व्यवस्थपन साठीची शिर्षके ही ५0२असून एकूण ग्रंथ संख्या ही ४ हजार१५३ आहे. राष्ट्रीय २0 आहेत तर आंतरराष्ट्रीय छापील नियतकालिकांची सेवा दिली जात नाही.तर ऑनलाईन नियतकालिके,J-GATE,RMIT,BCRC,ASME,SCIENCE DIRECT,ASCE,MANAGEMENT WILEY,BLACK WELL,MCGRAW HILL व IEEE, ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल

श्रीमती. अमिता प्रधान असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही अकरा आहे.या ग्रंथालयातून २४तास सेवा पुरवली जाते.

११.संशोधकाने अभ्यासलेले अकरावे व्यवस्थापन महाविद्यालय एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज आहे. या महाविद्यालयास एन.बी.एन.(NBN) या नावानेही ओळखले जाते.या महाविद्यालयाची स्थापना सन.२०१०ला झाली आहे.हे महाविद्यालय सर्वे.नबंर १०/१,आंबेगाव ,तालुका-हावेली,सिंहगड रोड,पुणे-४११०४१ येथे आहे.या महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ.श्रीराम मारकंडे हे आहेत.या महाविद्यालयाची सन.२०१०ला विद्यार्थी संख्याही ६० होती.तर त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.७०हजार होते.

या महाविद्यालयच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा वार्षिक आहे.सन२००७ ला या महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अर्थसंकल्प १४लाख होता.ग्रंथ संख्या ही २,४०० असून छापील नियतकालिके राष्ट्रीय २४ व आंतरराष्ट्रीय२४होती.२०१०साली ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही दोन असून ग्रंथालय आठ तास सेवा देत असे.

सन.२०१२ ला १८०विद्यार्थी संख्या असून त्यांचे प्रवेश शुल्क हे रु.८२हजार आहे.सन.२०१२-२०१३ चा ग्रंथालयांचा अर्थसंकल्प हा रु.१५लाख आहे.ग्रंथालयातील एकूण शिर्षके ही ४५६असून एकूण ग्रंथ संख्या ही ७ हजार ३७४०आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय छापील नियतकालिकांची सेवा दिली जात नाही. तर ऑन लाईन नियतकालिके,J-GATE,RMIT,JSMS व BCRC ही आहेत.या ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्रीमती जाधव असून ग्रंथालयीन कर्मचारी संख्या ही चार आहे.या ग्रंथालयातून २४तास सेवा पुरवली जाते.

अशा प्रकारे प्रस्तुत संशोाधन करत असताना संशोधकाला व्यवस्थापन महाविद्यालयची मिळालेली माहिती पुढील तक्त्यात दिसून येते. या अकरा महाविद्यालयीन ग्रंथालयापैकी दोन ग्रंथालये ही इंजिनिअरींग महाविद्यालयाची घेतली आहेत कारण त्या महाविद्यालयामध्ये व्यावस्थापनाची ही शाखा चालु आहे.

---

३०. http://www.sinhgad.edu

संशोधकाने अभ्यासलेली महाविद्यालयाची टेबलमधील यादी पुढील प्रमाणे आहे .

| Sr. No | Institute Name | Establish Year | Address | Head of Institute | Name of Librarian | Library Budget |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Sinhgad Institute of Management | 1994 | Sr.No 44/1, Vadgaon (Bk) off Sinhgad Road Pune-411041 | Dr,Nilesh Ghokhale | Mr. S.D. Tadage | |
| 2 | SKN Sinhgad School of Business Management | 2010 | Sr. No. 10/1 Ambegaon (Bk) Tal. Haveli, Pune-411041 | Dr. Rajashree Shinde | Mr. R. R Viswe | Annual |
| 3 | Sinhgad Institute of Management & Computer Application | 2004 | 49/1 Pune Mumbai Off westerly bypass, NarheAmbegaon | Dr. Milind Marathe | Mrs. Chhaya Karle | Annual |
| 4 | Sinhgad School of Business | 2010 | 49/1 Pune Mumbai Off westerly | Dr.Shailendrkale | Mrs. S. Apate | Annual |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Studies | | bypass, NarheAmbeg aon | | | |
| 5 | Sinhgad Institute of Business Administrati on and Research | 2004 | Near PMC Octori Post Kondhawa (Bk), Saswad Road, Pune – 411048 | Prof. Avdhoot Pol | Mr. Bipin Nirgide | Annual |
| 6 | Sinhgad Business School | 2007 | 19/15 Smt. KhilareMarg, Off Karve Road, Erandwane – 411004 | Dr. Aditi Markale | Mrs. Rohini Madre-kar | Annual |
| 7 | STES' Sinhgad Business School | 2007 | 19/15 Smt. KhilareMarg, Off Karve Road, Erandwane – 411004 | Dr. S. U Gawade | Mrs. Rohini Madre -kar | Annual |
| 8 | Sinhgad institute of Business Administrati on & | 2004 | 309/310 Kusgaon (Bk), Off Mumbai - Pune Express | Dr. Parag C Kalkar | Mrs. Geeta Diwar | Annual |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Computer Application | | Highway, Lonavala, Pune – 410401 | | | |
| 9 | Smt. Kashibai Navale College of Engineering | 2000 (2008) | Sr.No 44/1, Vadgaon (Bk) off Sinhgad Road Pune-411041 | Dr. Arvind V. Deshpande | Mr. Chandr-amohan Tondur | Annual |
| 10 | Sinhgad College of Engineering | 1993 (2008) | Sr.No 44/1, Vadgaon (Bk) off Sinhgad Road Pune-411041 | Mr. Shashikant Lokhande | Dr. Amita Pradhan | Annual |
| 11 | NBN Sinhgad Technical Institute Campus | 2010 | Sr. No. 10/1 Ambegaon (Bk) Tal. Haveli, Pune-411041 | Dr. Shriram D. Markande | Mrs. S. D Jadhav | Annual |

| Sr. No. | Institute Name | Library Timing | Total Book Titles | Total Book Volume | Journals | | E-Journals |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Na-tional | Inter-nationa l | |
| 1 | Sinhgad Institute of Management | 24/7 | 4752 | 36770 | 122 | 31 | J-Gate, RMIT, BCRC, Proquest |
| 2 | SKN Sinhgad School of Business Management | 24/7 | 910 | 5069 | 60 | 05 | J-Gate, RMIT, BCRC |
| 3 | Sinhgad Institute of Management & Computer Application | 8.00 AM To 12.00 PM | 4000 | 25778 | 41 | 00 | J-Gate, RMIT, BCRC |
| 4 | Sinhgad School of Business Studies | 8.00 AM To 8.00 PM | 912 | 5192 | 60 | 00 | J-Gate, RMIT, BCRC |
| 5 | Sinhgad Institute of Business Administratio n and | 8.00 AM To 12.00 PM | 3167 | 36197 | 85 | 22 | J-Gate, RMIT, BCRC, ASPP, SPSF version – 18 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Research | | | | | | |
| 6 | Sinhgad Business School | 8.00 AM To 1.00 PM | 1669 | 7820 | 00 | 00 | J-Gate, RMIT, BCRC |
| 7 | STES' Sinhgad Business School | 8.00 AM To 1.00 PM | 720 | 7880 | 45 | 00 | J-Gate, RMIT, BCRC |
| 8 | Sinhgad institute of Business Administration & Computer Application | 8.00 AM To 12.00 PM | 6000 | 27000 | 137 | 66 | J-Gate, RMIT, BCRC, DIG, IEEE |
| 9 | Smt. Kashibai Navale College of Engineering | 24/7 | 565 | 3798 | 155 | 05 | J-Gate, RMIT, BCRC, IEEE, ASME, Science Direct |
| 10 | Sinhgad College of Engineering | 24/7 | 502 | 4153 | 20 | 00 | J-Gate, RMIT, BCRC, IEEE, ASME,ASPP, Science Direct, ASCE, Management |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | Wiley, Blackwell, McGraw Hill |
| 11 | NBN Sinhgad Technical Institute Campus | 24/7 | 456 | 2740 | 00 | 00 | J-Gate, RMIT, BCRC, JSMS |

प्रकरण – ४थे

# माहिती संकलन ,सादरीकरण आणि विश्लेषण

समस्या निर्माण झाल्यानंतर त्यावर विविध उपाय योजून ती समस्या दूर करण्यात येते. संशोधनाची सुरूवात समस्येतून होते. संशोधनात येणाग्रा समस्या म्हणजेच गृहीतकृत्याची मांडणी केली जाते व त्यानुसार उद्देश निश्चित करण्यात येतात ते उद्देश म्हणजेच संशोधनाची उद्दिष्टे होत. या प्रकरणात संशोधकाने संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण केले आहे. सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाग्रा व्यवस्थापन महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास करताना प्रामुख्याने ".पुणे शहर" याचा विचार करण्यात आला आहे. संशोधकास संशोधनासाठी असलेले वेळेचे बंधन लक्षात घेता संशोधकाने सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीमधील एकुण अकरा महाविद्यालयातील ग्रंथालयाचा अभ्यास केला आहे.

संशोधकाने प्रत्यक्ष भेट घेऊन ,पोस्टाव्दारे प्रश्नावली पाठवून तसेच अन्य साधनांचा वापर करून जास्तीत जास्त ग्रंथालयाची माहिती मिळण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रश्न.क.१ ते १.६ मध्ये संशोधकाने सर्वसाधरण सस्थेंचे नाव,महाविदयालयाचे नाव ,पत्ता, दूरध्वनी कमांक ,फॅक्स नंबर ,स्थापना वर्ष विदयापीठ संलग्नता इत्त्यादीची माहिती विचारली आहे.

## १.७ एन.बी.ए.मुल्यमापन (National Board Accreditation)मिळाले आहे का?

शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन करीत असताात त्या संस्था किती प्रमाणामध्ये विद्यापीठाने व विद्यापीठा अनुदान मंडळाने तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने आखून दिलेल्या नियमांचे किती प्रमाणात पालन करते व तेथे प्रवेश घेऊ इच्छिणाग्रा विद्यार्थ्याला कोणत्त्या

दर्जाचे शिक्षण दिले जाते.तसेच विविध संस्थांनी ज्या तंत्रशिक्षणाच्या कार्यामध्ये कार्यरत आहे. अशांनी नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडेशन कडून त्यांचे मुल्यांकन करून घ्यावे असे अभिप्रेत आहे.व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने हे अनिवार्य केलेले आहे.या अंतर्गत व्यावसायिक शिक्षण संस्थांनी उच्च दर्जाचे तंत्रशिक्षण विद्यार्थ्यांना व ते सतत चांगल्या दर्जाचे असावे यासठी योग्य ती कार्यपद्धती विकसित करणे व टिकवून ठेवणे यावर भर दिला जातो.

**एन.बी.ए.चे उद्देश-**

१.ज्यांनी यामध्ये पैसा गुंतविलेला आहे(पालक,विद्यार्थी,शिक्षक,कंपनी,कर्मचारी,सरकार) या सर्वांना त्या त्या संस्थेत AICTE ने ठरवून दिलेल्या स्टँडर्सप्रमाणे सोयी सवलती आहे किंवा नाही हे ओळखण्यासाठी मदत करणे.

२.सध्या उपलब्ध अभ्यासक्रमामध्ये आणखी प्रगती करण्यासाठी आणि नवीन अभ्यासक्रमामध्ये विकास घडवून आणण्यासाठी संस्थांना मार्गदर्शक सूचना करणे.

३.उत्तम स्टँडर्स राखण्यासाठीच्या पक्रियेला संस्थांना प्रेरीत करणे आणि यामध्ये विकास घडवून आणण्यासाठी प्रोत्साहन देणे.

**तक्ता क्रमांक १**

**१.७ एन.बी.ए.मुल्यमापन (National Board Accridation)मिळाले आहे का?**

| **१.७ एन.बी.ए.मुल्यमापन मिळाले आहे का** | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क | महाविदयालयाचे नाव | होय | नाही | वर्षे |
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनजमेंट | √ | | ३ |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनजमेंट | | √ | |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनजमेंट ॲण्ड कॉप्युटर ॲप्लिकेशन | √ | | ३ |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | | √ | |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | | √ | |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | | √ | |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | | √ | |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्पुटर ॲप्लिकेशन | √ | | ३ |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | √ | | ३ |
| १0 | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | | √ | |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनजमेंट स्टडीज | | √ | |

वरील टेबलवरून असे निर्देशनास येते की, संशोधकाने कॉलेजचे एन.बी.ए मुल्यमापन मिळाले आहे का? असा प्रश्न विचारला असता सिंहगड इन्सटीटयुट ऑफ मॅनजमेंट, सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनजमेंट ॲण्ड कॉप्युटर ॲप्लिकेशन, सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉप्युटर ॲप्लिकेशन आणि श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग या कॉलेजचे मुल्यमापन झाले आहे. म्हणजेच होय असे उत्तर मिळाले तर

बाकीच्या एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनजमेंट, सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज, सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च , सिंहगड बिझनेस स्कुल, एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल, सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग आणि एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनजमेंट स्टडीज या सात कॉलेजचे एन. बी. ए मुल्यमापन झाले नाही.

**तक्ता क्रमांक २**

**१.८ एकूण प्रवेश क्षमता किती आहे.**

| अ.क | महाविदयालयाचे नाव | एकूण क्षमता |
|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | ६०० |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | ३०० |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | १८० |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | ३०० |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | ३६० |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | १२० |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | ३६० |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | ३६० |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | ३६० |
| १० | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | ६० |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | १८० |

स्तंभालेख क्रमांक १




या अलेखावरुन असे दिसून येते कीसिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ही सर्वात जास्त म्हणजेच ६00 आहे. तर बाकीच्या कॉलेजसची प्रवेश क्षमता एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंटची ३00,सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनजमेंट ॲण्ड कॉप्युटर ॲप्लिकेशन ची १८0,सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज ची ३00,सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च ची ३६0,सिंहगड बिझनेस स्कुल ची १२0,एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल ची ३६0, श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ची ३६0, सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ची ६0 आहे. तर एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ची प्रवेश क्षमता ही १८0 आहे.

**तक्ता क्रमांक ३**

**१.९ ग्रंथालयाची वेळ किती आहे.**

| अ.क | महाविदयालयाचे नाव | कीती तास |
|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | २४ |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | २४ |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | १६ |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | १२ |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | १६ |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | १८ |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | १८ |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | १६ |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | २४ |
| १0 | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | २४ |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | २४ |

स्तंभालेख क्रमांक २




प्रश्न क्रमांक १.९ मध्ये संशोधकाने ग्रंथालयाची वेळ विचारली आहे.आलेख काढला असता असे दिसून येते की सिंहगड मधील व्यवस्थापन महाविद्यालयाची सर्व ग्रंथालये कमीत कमी १२ तास आणि जास्तीत जास्त २४ तास सेवा देत आहेत.वरील आलेखात अकरा पैकी सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनजमेंट, एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनजमेंट, सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस अडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन,श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ही पाच कॉलेजसची ग्रंथालये २४ तास चालू आहेत तर सिंहगड बिझनेस स्कुल,एस.टी.एस.सिंहगड बिझनेस

स्कुल ही १८ तास चालू आसून सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन,सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस अडमिन ॲण्ड रिसर्च आणि सिंहगड

इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस अडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन ही १६ तास सेवा देत आहेत.

यावरून आसे लक्षात येते की सिंहगड मधील व्यवस्थापन महाविद्यालयाची सर्व ग्रंथालये जास्तीत जास्त सेवा देण्याचा प्रयत्न करत आहेत.

**तक्ता क्रमांक ४**

**१.१0 ग्रंथालयातील कर्मचारी किती आहेत.**

| अ.क | महाविदयालयाचे नाव | ग्रंथपाल | साहाय्यक ग्रंथपाल | ग्रंथालय लिपीक | ग्रंथालय परिचर | इतर |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | १ | ५ | २ | ३ | |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | १ | | | | |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | १ | २ | १ | १ | |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | १ | १ | | | |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | १ | ३ | २ | १ | |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | १ | २ | १ | १ | |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | १ | २ | १ | १ | |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | १ | ३ | २ | १ | |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | १ | २ | ३ | १ | |
| १0 | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | १ | ४ | ४ | २ | |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | १ | ३ | | १ | |

**स्तंभालेख  क्रमांक ३**




प्रश्न कमांक १.१० मध्ये संशोधकाने कर्मचारी संखेबद्दल विचारणा केली आहे त्यानुसार मिळालेल्या माहितीनुसार आलेख काढला आसता, यामध्ये निळा रंगामध्ये ग्रंथपालाची संख्या दाखवत आसून  ती म्हणजेच सारखी आहे. त्या पाठोपाठ सगळयात जास्त साहाय्यक ग्रंथपालाची संख्या आसून ती लाल रंगानी निर्देशीत केली आहे.यामध्ये सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट मध्ये सर्वात जास्त साहाय्यक ग्रंथपालाची संख्या आसून सर्वात कमी सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज कॉलेजची आहे.

वरील आलेखामध्ये ग्रंथालय लिपीक हिरव्या रंगात तर निळया रंगात ग्रंथालय परिचारक दाखवले आहेत. यामध्ये ग्रंथालय परिचारक सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मध्ये जास्त आहेत. वरील आलेखावरून आपल्याला आसे दिसून येते की ग्रंथपाल हा एकच कर्मचारी आसणारे एकच महाविद्यालय आहे व त्याचे नाव एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट आहे.

**तक्ता क्रमांक ५**

**१.११ ग्रंथालय व्यवस्थापनासाठी ग्रंथालय समिती आहे का?**

| अ.क | महाविदयालयाचे नाव | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | √ | |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | √ | |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | √ | |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | √ | |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | √ | |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | √ | |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | √ | |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | √ | |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | √ | |
| १0 | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | √ | |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | √ | |

प्रश्न कमांक १.११ मध्ये संशोधकाने ग्रंथालय समिती आहे का?असा प्रश्न विचारल्यास सर्व ग्रंथपालाचे उत्तर होय असे आले आहे.यावरून आसे लक्षात येते की ग्रंथालयासाठी ग्रंथालय समिती ही आवश्यक आहे.

**तक्ता क्रमांक ६**

**१.१२ ग्रंथालयाचा निधी कोणत्त्या मार्गाने उपलब्ध होतो.**

| अ.क | महाविदयालयाचे नाव | UGC | Self funded | AICTE |
|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | | √ | |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | | √ | |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | | √ | |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | | √ | |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | | √ | |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | | √ | |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | | √ | |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | | √ | |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | | √ | |
| १0 | सिंहगड कॉलिज ऑफ इंजिनिअरींग | | √ | |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | | √ | |

ग्रंथालय निधी कोणत्या मार्गाने उपलब्ध होतो असा प्रश्न विचारून संशोधकाने तीन पर्याय दिले होते.त्यापैकी सर्व ग्रंथपालांचे उत्तर (Self Funded) हे आहे या वरून हे लक्षात येते की, सिंहगड कॉलेजमधील सर्व ग्रंथालये ही (Self Funded)आहेत.

**तक्ता क्रमांक ७**

२. **ग्रंथालयाच्या अर्थसंकल्पाचा अर्थिक वर्षाचा कालावधी**

| अ.क | महाविदयालयाचे नाव | **मार्च ते एप्रिल** | **जानेवारी ते डिसेंबर** |
|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | √ | |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | √ | |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड  कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | √ | |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | √ | |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | √ | |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | √ | |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस  स्कुल | √ | |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | √ | |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | √ | |
| १0 | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | √ | |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ  मॅनेजमेंट स्टडीज | √ | |

संशोधकाने ग्रंथालयाच्या अर्थसंकल्पाचा अर्थिक वर्षाचा कालावधी विचारून त्यामध्ये दोन पर्याय दिले आसता असे दिसून आले की सिंहगड कॉलेजमधील सर्व ग्रंथालयाचा अर्थिक वर्षा चा कालावधी मार्च ते एप्रिल हा आहे.

## तक्ता क्रमांक ८

### ३. ग्रंथालयाचे मागील पाचवर्षाचे पूर्ण अर्थसंकल्प

| अ.क | महाविदयालयाचे नाव | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | ३५,००,००० | ३५,००,००० | ३५,००,००० | ३५,००,००० | २६,००,००० |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | | | १०,००,००० | १२,००,००० | १४,००,००० |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | | | १२,००,००० | १४,००,००० | १०,००,००० |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | | | ७,००,००० | १५,००,००० | २१,००,००० |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | ३०,७५,००० | १९,५६,००० | ३२,२९,००० | ४९,७७,००० | ३५,४१,००० |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | ६,००,००० | ८,००,००० | १०,००,००० | १२,००,००० | १३,००,००० |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | २७,८०,००० | २५,५०,००० | २८,४०,००० | ३८,७५,००० | ३०,००,००० |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | १०,००,००० | ११,५०,००० | १२,००,००० | १३,००,००० | १५,००,००० |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | १२,००,००० | १४,००,००० | १८,००,००० | २०,००,००० | २५,००,००० |
| १० | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | ३०,००,००० | ५१,००,००० | ६३,००,००० | ६८,००,००० | ७०,००,००० |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | | | १४,००,००० | १३,००,००० | १५,००,००० |

**स्तंभालेख क्रमांक ४**




प्रश्न कमांक ३ मध्ये संशोधकाने ग्रंथपालास मागील पाच वर्षाचे अर्थसंकल्प मागितला आहे. यामध्ये सन.२00८-0९ साठी निळा रंग ,सन.२00९-१0साठी लाल,सन.२0१0-११ साठी हिरवा तर सन.२0११-१२साठी गडद निळा आणि सन.२0१२-१३ साठी फेन्ट निळा रंग घेतला आहे यामध्ये सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट कॉलेजचे अर्थसंकल्प हा पहिले चार वर्षे स्थिर आसून सन. २0१२-१३ ला कमी झाले आहे. एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंटमध्ये तीन्ही वर्षे वाढत गेलेले दिसते, सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट मध्ये कमी-जास्त-कमी आसा आलेख दिसत आहे, तर सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज मध्ये वाढत गेले आहे, सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च मध्ये पहिले चार वर्षे वाढत गेले आहे, तर सन.२0१२-१३ ला ते कमी झाले आहे, सिंहगड बिझनेस स्कुल मध्ये पाच वर्षे ते वाढत गेलेले दिसून येते, एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल मध्ये पाच ही वर्षे कमी जास्त होताना दिसते. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन , श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ

इंजिनिअरींग आणि सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मधे पाच वर्षे अर्थसंकल्पात वाढ होत गेली आहे, तर एन.बी.एन.स्कुल ऑफ  मॅनेजमेंट स्टडीज मध्ये  मध्येच अर्थसंकल्प कमी झाले आहे, तर सन. २०१२-१३ ला परत थोडे वाढले आहे.

**तक्ता क्रमांक ९**

**४.   ग्रंथालय अर्थसंकल्पाचा ग्रंथ आणि ईबुक्सवर  होणारा वापर.**

| अ.क | महाविदयालयाचे नाव | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | ६,६५,८०८ | ७,७६,९८३ | ६,४४,२९५ | ५,१५,७८६ | ४,०७,९९१ |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | | | ४,००,००० | ४,५०,००० | ५,००,००० |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड  कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | | | ९,००,००० | १०,००,००० | ५,००,००० |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | | | २,००,००० | ७,००,००० | १५,००,००० |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | १६,५०,००० | २,५६,००० | ७,२९,००० | २०,००,००० | १५,००,००० |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | २,५०,००० | ३,००,००० | ३,५०,००० | ४,००,००० | ५,००,००० |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | ८,५०,००० | ७,००,००० | ८,००,००० | १८,००,००० | १३,००,००० |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | ३,००,००० | ३,५०,००० | ३,७०,००० | ४,००,००० | ५,००,००० |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | ९६,५०० | ९८,००० | ९८,५०० | १,००,५०० | १,२०,३०० |
| १० | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | ५१,७३० | ४२,३६० | ६९,६७० | ४७,२४० | २३,५५० |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | | | १५,००,००० | १४,००,००० | १३,००,००० |

**स्तंभालेख क्रमांक ५**




प्रश्न क्रमांक चार मध्ये संशोधकाने ग्रंथ आणि ई बुक्सावर होणाऱ्या वापराबावत विचारले आहे. यामध्ये आपल्याला असे दिसून येते की सिंहगड मधील महाविद्यालयामध्ये ई बुक्सची सेवा आजुन सुरू झाली नाही.

यामध्येसन.१२-१३ साठी फिक्कट जांभळा, ११-१२ साठी जांभळा,सन. १0-११ साठी हिरवा, आणि सन.२00९-१0 साठी लाल तर सन.२00८-0९ साठी निळा रंग दर्शविले आहेत. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट मध्ये सार्वात जास्त ग्रंथ खरेदी सन. २00९-१0 ला झालेली आपल्याला आलेखात दिसून येते. कॉलेज एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ

बिझनेस मॅनेजमेंटमध्ये सन.१२-१३ ला जास्त ग्रंथ खरेदी झाली आहे. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट अॅण्ड कॉम्प्युटर अॅप्लिकेशन मध्ये सन.२०१०-११ ला जास्त झाली आहे तर सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज मध्ये ही सन.२०१२-१३ ला जास्त ग्रंथ खरेदी झाली आहे.

सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस अॅडमिन अॅण्ड रिसर्चमध्ये सर्वात जास्त सन.२०११-१२ ला ग्रंथ खरेदी झाली आहे तर सर्वात कमी सन.२००९-२०१० ला झाली आहे. सिंहगड बिझनेस स्कुल मध्ये सर्वात जास्त असून ग्रंथ खरेदी सन.२०१२-१३ ला झाली असून बाकी चार वर्षे सारख्या प्रमाणात झालेली दिसते. एस.टी.ई.एस.सिंहगड बिझनेस स्कुल मध्ये सर्वात जास्त सन.२०११-१२ ला ग्रंथ खरेदी झाली आसून त्यानंतर सन.२०१२-१३ ला झाली आहे तर बाकी तीन वर्षे सारख्या प्रमाणात झालेली दिसून येते. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस अॅडमिनीस्ट्रेशन अॅण्ड कॉम्प्युटर अॅप्लिकेशन मध्ये सन.२०१२-१३ ला जास्त ग्रंथ खरेदी झाली असून बाकी चार वर्षे सारख्या प्रमाणात झाली आहे. श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मध्ये आणि सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मध्ये पाचही वर्षे जवळजवळ सारख्या प्रमाणात ग्रंथ खरेदी झाली आहे. तर एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मध्ये सन.२०१२-१३ आणि सन२०१०-११ ला जवळजवळ सारख्या प्रमाणात खरेदी झाली असून सन.२०११-१२ ला सर्वात कमी ग्रंथ खरेदी झाली आहे.

## तक्ता क्रमांक १०

**५ . ग्रंथ बांधणी साठीचा अर्थसंकल्प .**

| अ . क | महाविदयालयाचे नाव | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | २५,००० | २५,००० | २७,००० | २९,००० | ३०,००० |
| २ | एस . के . एन . सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | | | २५,००० | २५,००० | २५,००० |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | | | | १०,००० | १५,००० |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | | | २०,००० | १५,००० | १५,००० |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | | | २०,००० | ३०,००० | |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | २०,००० | २५,००० | २५,००० | २०,००० | २०,००० |
| ७ | एस . टी . एस . सिंहगड बिझनेस स्कुल | ५,००० | ८,००० | १०,००० | २०,००० | ३०,००० |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | १५,००० | १६,००० | १८,००० | १९,००० | २०,००० |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | २३,००० | २२,००० | २०,००० | २७,००० | ३५,००० |
| १० | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | ११,००० | १०,००० | १२,००० | १७,००० | १२,००० |
| ११ | एन . बी . एन . स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | | | १०,००० | १५,००० | १५,००० |

**स्तंभालेख क्रमांक ६**




संशोधकाने ग्रंथ बांधणी साठीच्या अर्थसंकल्पाबाबत प्रश्न कमांक पाच मध्ये विचारले आसून खालील आलेखामध्ये यामध्ये बांधणी अर्थसंकल्पात सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनजमेंटचे व श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे बांधणी अर्थसंकल्प जास्त आहे.

यामध्ये आपल्याला असे दिसून येते की जशी ग्रंथालयातील पुस्तके जुनी होत जातील तसा बांधणी खर्च वाढत जातो त्यामुळे सन. २०१२-१३ चा आलेख हा चढता आहे.

आलेख काढताना त्याप्रमाणे सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट मध्ये सन.२०१२-१३ ला सर्वात जास्त तर इतर चार वर्षे जवळजवळ सारखा अर्थसंकल्प दिसत आहे. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च मध्ये तीन वर्षे सारखेच अर्थसंकल्प दिसत आहे. तर सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मध्ये दोनच वर्षा चा अर्थसंकल्प दिला असून सन्.२०१२-१३ चे अर्थसंकल्प हा सन.२०११-१२ पेक्षा जास्त

आहे असे दिसून येते. सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज चे सन.२०१०-११ चा अर्थ संकल्प जास्त असून इतर दोन वर्षाचा अर्थसंकल्प हा सारखा वाटत आहे. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च मध्ये सन.२०११-१२ चा अर्थसंकल्प हा सन.२०१०-११ पेक्षा जास्त आहे असे दिसून येत आहे. सिंहगड बिझनेस स्कुल मध्ये सन.२००९-१० आणिसन.२०१०-११ चा अर्थसंकल्प थोडा जास्त असून बाकी तीन वर्षाचा अर्थसंकल्प हा सारखाच दिसत आहे. एस.टी.ई.एस.सिंहगड बिझनेस स्कुल आणि सिंहगड इन्स्टिटयुटऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मध्ये नियतकालिक बाधणीचे अर्थसंकल्प हा वाढत गेलेला दिसून येतो. यामध्ये सर्वात जास्त अर्थ संकल्प हा सन.२०१२-१३ चा असून सर्वात कमी अर्थसंकल्प सन.२००८-०९ चा आहे. श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मध्ये सर्वात जास्त अर्थसंकल्प रक्कम सन. २०१२-१३ ची आहे तर सर्वात कमी सन.२०१०-११ ची आहे. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मध्ये सर्वात जास्त अर्थसंकल्प हा सन.२०११-१२ चा असून बाकी चार वर्षाचा अर्थसंकल्पाची रक्कम जवळजवळ सारखीच आहे असे दिसून येते.

**तक्ता क्रमांक ११**

## ८.छापील नियतकालिक वर्गणी अर्थसंकल्प (Printed journal)

| अ.क | महाविदयालयाचे नाव | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | ११,२९,७११ | १८,४१,५६० | १५,३७,३७७ | ३,२१,४१८ | २,८६,००० |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | | | २,५,००० | १,५०,००० | १,५०,००० |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | | | १,००,००० | १,२०,००० | १,००,७०० |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | | | २,००,००० | २,००,००० | १,००,००० |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | ९,३३,००० | १५,००,००० | १७,६७,२४० | ३,२१,००० | २,४०,००० |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | २,००,००० | २,३०,००० | १,००,००० | १,५०,००० | |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | ५,२०,३६० | ३,१३,५१९ | २,४०,००० | १,५०,००० | **१,४२,०००** |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | ४,००,००० | ४,५०,००० | ६,००,००० | ६,००,००० | ३,००,००० |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | १,६५,००० | १,७०,००० | १,८८,००० | २,२५,००० | ३,२५,००० |
| १० | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | २,२०,००० | २,४०,००० | १,५०,००० | १,८०,००० | २,००,००० |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | | | | ८०,००० | १,००,००० |

शंकुलेख क्रमांक ७




प्रश्न क्रमांक आठ मध्ये संशोधकाने छापील नियतकालिक वर्गणीबाबत अर्थसंकल्प विचारला असता सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट मध्ये आपल्याला असे दिसून येते की सगळयात जास्त अर्थसंकल्प हा सन.२00९-१0 चे असून त्यानंतर नियतकालिक वर्गणी अर्थसंकल्प कमी कमी होत गेलेले दिसून येत आहे. एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस

मॅनेजमेंट मध्ये सन.२०१०-११ चे अर्थसंकल्प जास्त असून सन.२०११-१२आणि सन.२०१२-१३ चा अर्थसंकल्प स्थिर दिसतो. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मध्ये अर्थसंकल्प वाढत गेला आहे या मध्ये सन.२०१२-१३ चे जास्त असून सन.२०१०-११ चे कमी आहे. सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज मध्ये सन.२००९-१० चे कमी असून सन.२०१०-११ व सन.२०११-१२ तो वाढला आहे तर सन.२०१२-१३ ला परत कमी झाला आहे. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च आणि सिंहगड बिझनेस स्कुल मध्ये आपल्याला अर्थसंकल्प कमी जास्त होताना दिसत आहे. एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल मध्ये आपल्याला वर्गणी अर्थसंकल्प कमी होत जाताना दिसत आहे तर सन.२००८-०९ चे सर्वात जास्त असून सन.२०१२-१३ ला सर्वात कमी झाला आहे.

सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मध्ये सुरूवातीला अर्थसंकल्प वाढत गेला असून सन.२०१०-११ व सन.२०११-१२ ला तो स्थिर झाला आहे तर सन.२०१२-१३ ला ते पुन्हा कमी झालला दिसत आहे. श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मध्ये आपल्याला अर्थसंकल्प चढता क्रम दिसत आहे.सन.२०१२-१३ ला ते सर्वात जास्त दिसत आहे. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मध्ये अर्थसंकल्प कमी जास्त होताना दिसत आहे. यामध्ये सन.२००९-१० सर्वात जास्त असून सन.२०सन.२०१०-११ ला सर्वात कमी आहे. एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मध्ये अर्थसंकल्प वाढत गेला आहे.

### तक्ता क्रमांक १२

**६ .छापील नियतकालीकांच्या बांधणी साठीचा अर्थसंकल्प**
**(Printed journals)**

| अ .क | महाविदयालयाचे नाव | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | ३०,००० | ३२,००० | ३५,००० | ३७,००० | ३८,००० |
| २ | एस .के .एन .सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | | | २०,००० | २५,००० | २०,००० |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | | | | १२,००० | १०,७०० |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | | | १५,००० | १०,००० | १०,००० |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | | | | | ३०,००० |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | १०,००० | १५,००० | २२,००० | २५,००० | २७,००० |
| ७ | एस .टी .एस .सिंहगड बिझनेस स्कुल | १८,००० | १५,००० | २०,००० | १०,००० | **१०,०००** |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | २५,००० | २७,००० | २८,००० | २५,००० | ३०,००० |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलिज ऑफ इंजिनिअरींग | १०,००० | १२,००० | १४,००० | १५,००० | १८,००० |
| १० | सिंहगड कॉलिज ऑफ इंजिनिअरींग | | | | | |
| ११ | एन .बी .एन .स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | | | ८,००० | १२,००० | ८,००० |

**स्तंभालेख क्रमांक ८**




प्रश्न कमांक सहा मध्ये संशोधकाने नियतकालिक बांधणीसाठीच्या अर्थसंकल्पाबाबत विचारणा केली आसता,सिंहगड इन्स्टिटयुटऑफ मॅनेजमेंट मध्ये असे दिसून येते की अर्थसंकल्प हा वाढत गेला आहे यामध्ये सर्वात कमी सन.२००८-०९ चे असून सर्वात जास्त सन.२०१२-१३ चा आहे.

एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट मध्ये सन.२०११-१२ चा जास्त आसून सन.२०१०-११ आणि सन.२०१२-१३ चे अर्थसंकल्प हा सारखाच आहे असे दिसून येते. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मध्ये दोन वर्षाचा अर्थसंकल्प दिला असून सन.२०११-१२ चा अर्थसंकल्प हा सन.२०१२-१३ पेक्षा कमी आहे. सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज मध्ये असे दिसुन येते की सन.२०१०-११ चा अर्थसंकल्प जास्त

आसून बाकी दोन वर्षाचा अर्थसंकल्प सारखाच आहे सिंहगड इन्स्टिटयुटऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्चचा अर्थसंकल्प हा एक वर्षाच दिला आसून यावरून आपल्याला असे दिसून आले की त्यांनी एखादया नियतकालीकाची बांधणी करून घेतली आहे. सिंहगड बिझनेस स्कुल चा अर्थसंकल्प वाढत गेलेला दिसून येतो तर सिंहगड इन्स्टिटयुटऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मध्ये बांधणी अर्थसंकल्प वाढत गेला असून सन.२०११-१२ चे कमी झाल्याचे दिसून येत आहे. श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींगमध्ये असे दिसून येते की सन.२००८-०९ पासून सन.२०१२-१३ पर्यंत बांधणी अर्थसंकल्प हा वाढतच गेला आहे. तर एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मध्ये सन.२०११-१२ ला जास्त आसून सन.२०१०-११ आणि सन.२०१२-१३ ला सारखाच आहे.

**तक्ता क्रमांक १३**

**७ ऑनलाईन डेटाबेस (online subscribtion) वर्गणी अर्थसंकल्प .**

| अ.क | महाविदयालयाचे नाव | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | ७४,८२० | ३६,६०० | ३६,००० | ४,४०,३५९ | ६,५४००० |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ विझनेस मॅनेजमेंट | | | ३६,००० | १,६३,९७० | १,५८,९९५ |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | | | ४,००,००० | ४,००,००० | ४,००,००० |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ विझनेस स्टडीज | | | ६०,००० | ६८,००० | १,६३,००० |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ विझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | ३,७५,००० | २,७०,००० | ७,००,००० | ५,००,००० | ५,००,००० |
| ६ | सिंहगड विझनेस स्कुल | ३६,००० | ३६,००० | १,६३,९७० | १,५८,९९५ | १,६५,००० |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड विझनेस स्कुल | ७४,८२० | ३६,६०० | ३६,००० | १,४०,००० | **१,६५,०००** |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ विझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | ७४,८२० | ३६,६०० | ३६,००० | ४,४०,३५९ | ३,५४,००० |
| ९ | श्रीमती काशीवाई नवले कॉलिज ऑफ इंजिनिअरींग | ३,००,००० | ३,००,००० | ५,००,००० | १२,००,००० | १५,००,००० |
| १० | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | | | | १,९५,००० | २३,००,००० |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | | | | ३,००,००० | ३,००,००० |

**स्तंभालेख क्रमांक ९**




प्रश्न क्रमांक सात मध्ये संशोधकाने ऑनलाईन डेटाबेसबद्दल विचारणा केली असता,सिंहगड इन्स्टिटयुटऑफ मॅनेजमेंट मध्ये असे दिसून येते की अर्थसंकल्प हा वाढत गेला आहे. एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनजमेंट मध्ये सन.२0११-१२ चे डेटाबेस अर्थ संकल्प तीन्ही वर्षे सारखाच दिसून येत आहे. सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज मध्ये अर्थसंकल्प वाढत गेला आहे. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च मध्ये सन.२0११-१२ आणि सन.२0१२-१३ चे अर्थसंकल्प स्थिर असून सन.२0१0-११ चे अर्थ संकल्प हा सर्वात जास्त आहे. सिंहगड बिझनेस स्कुल मध्ये सन.२00८-0९ आणि सन.२00९-१0 चे अर्थसंकल्प स्थिर असून सर्वात जास्त अर्थसंकल्प रक्कम सन.२0१२-१३

ची आहे. एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल मध्ये सर्वात जास्त अर्थसंकल्प रक्कम सन.२०१२-१३ ला असून ती फिक्कट निळा रंगात दाखवली आहे त्याचप्रमाणे सन.२००९-१० आणिसन.२०१०-११ या कालावधीतील अर्थसंकल्प रक्कम स्थिर आहे तर सर्वात जास्त सन.२०११-१२ चे अर्थसंकल्प आहे. श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मध्ये अर्थसंकल्पाची रक्कम ही वाढत गेली असून सन.२०१२-१३ ला ती सर्वात जास्त दाखवत आहे. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग आणि एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मध्ये दोन दोन वर्षाचा अर्थसंकल्प दिला आहे. एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज चे अर्थसंकल्प हे स्थिर स्वरूपाचे म्हणजेच सारखेच दिसून येते.

### तक्ता क्रमांक १४

### ९.ग्रंथालय फर्निचर खरेदीसाठी लागणारा अर्थसंकल्प

| अ.क | महाविदयालयाचे नाव | २००८-२००९ | २००९-२०१० | २०१०-२०११ | २०११-२०१२ | २०१२-२०१३ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट | २,००,००० | २,००,००० | २,००,००० | २,५०,००० | ३,००,००० |
| २ | एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट | | | १,५०,००० | ५०,००० | ५०,००० |
| ३ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | | | २,६५,००० | ५०,००० | ६५,००० |
| ४ | सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज | | | १,००,००० | १,००,००० | २,७०,००० |
| ५ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च | | | ५,००,००० | १,००,००० | |
| ६ | सिंहगड बिझनेस स्कुल | २,००,००० | १,५०,००० | ९०,००० | ५०,००० | ५०,००० |
| ७ | एस.टी.एस.सिंहगड बिझनेस स्कुल | १,००,००० | २,००,००० | ५०,००० | ७०,००० | **५०,०००** |
| ८ | सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिनीस्ट्रेशन ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन | १,००,००० | ८०,००० | १,००,००० | ६०,००० | १,००,००० |
| ९ | श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | १,२५,००० | ८०,००० | ७०,००० | १,२५,००० | ९२,००० |
| १० | सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग | ५०,००० | ७०,००० | ८०,००० | १,००,००० | १२,००० |
| ११ | एन.बी.एन.स्कुल ऑफ मॅनेजमेंट स्टडीज | | | १,००,००० | ६०,००० | ५०,००० |

**स्तंभालेख क्रमांक १०**




प्रश्न क्रमांक नऊ मध्ये संशोधकाने फर्निचर खरेदीसाठी लागणारे अर्थसंकल्प विचारला असता या मध्ये सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट मध्ये सुरूवातीला स्थिर असून शेवटी वाढत गेलेले दिसून येत आहे. एस.के.एन.सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट मध्ये सर्वात जास्त असून सन.२0११-१२ आणि सन.२0१२-१३ ला ते स्थिर झाले आहे. सिंहगड इन्सटीटयुट ऑफ मॅनजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन मध्ये सुरूवातीला मोठया प्रमाणात खरेदी करून नंतर दोन वर्षे जवळजवळ सारखेच दिसून येत आहे. सिंहगड स्कुल ऑफ बिझनेस स्टडीज मध्ये सुरूवातीला दोन वर्षे स्थिर असून १२-१३ ला ते दुप्पटीपेक्षा जास्त वाढलेले दिसून येते. सिंहगड इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस ॲडमिन ॲण्ड रिसर्च मध्ये असे दिसून येते की २0१0-११ ला फर्निचर खरेदी मोठया प्रमाणात झाली आहे. सिंहगड बिझनेस

